# पिंपरी चिंचवड महानगरपालिका, पिंपरी - ४११ ०१८

## मा.महापालिका सभा

## कार्यपत्रिका क्रमांक -४६

## सभावृत्तांत

दिनांक :- २०.०४.२०१० वेळ :- दुपारी २.०० वाजता

पिंपरी चिंचवड महानगरपालिकेची माहे एप्रिल-२०१० ची मासिक मा.महापालिका सभा मंगळवार दि.२०.४.२०१० रोजी दुपारी २.०० वा. महानगरपालिकेच्या प्रशासकीय इमारतीमधील यशवंतराव चव्हाण सभागृहात आयोजित करणेत आली होती. सभेस खालील सन्मा.सदस्य उपस्थित होते.

१. मा.बहल योगेश मंगलसेन महापौर
२. मा.आसवानी डब्बु उपमहापौर
३. मा.भालेकर शांताराम कोंडीबा
४. मा. घुले रघुनंदन रामभाऊ
५. मा.जाधव विजया अशोक (मामी)
६. मा.थोरात एकनाथ दादा
७. मा.दत्तात्रय बाबुराव साने
८. मा.सौ.अलकाताई बाळासाहेब यादव
९. मा.लोखंडे सुजाता सुनिल
१०. मा.जाधव माऊली उर्फ ज्ञानेश्वर
११. मा.बो-हाडे शरद परशुराम
१२. मा.आल्हाट शांता महेंद्र

१३. मा.डॉ. सौ. मीना पाटील

१४. मा.खेडकर घनशाम रामचंद्र

१५. मा.सौ.सारिकाताई संतोषभाऊ लांडगे

१६. मा.सौ. बढे सुलोचना बबन

१७. मा.गवळी विजया पंडित

१८. मा.अजित दामोदर गव्हाणे

१९. मा.महेश किसन लांडगे

२०. मा.फुगे सुनंदाताई विजय

२१. मा.आशा अंकुश लांडगे

२२. मा.मोहिनी विलास लांडे

२३. मा.लोंढे संतोष ज्ञानेश्वर

२४. मा.सौ. वर्षा विलास मडीगेरी

२५. मा.सावळे सिमा

२६. मा.ननावरे जितेंद्र बाबासाहेब

२७. मा.भुंबे बाळासाहेब दिगंबर

२८. मा.राजेश उर्फ रामकृष्ण गोविंद स्वामी पिल्ले

२९. मा.भोसले हनुमंतराव भिमराव

३०. मा.यशवंत भोसले

३१. मा.कदम निर्मला सदगुरु

३२. मा.सौ.गुंजेकर स्मिता रमेश

३३. मा. चौधरी अख्तरहुसेन तालुकदार

३४. मा.आझम फकीरभाई पानसरे

३५. मा. चांदगुडे महेश गंगाराम

३६. मा.श्री.बाबर प्रकाश धरमसी

३७. मा.शेट्टी जगदिश

३८. मा.बोबडे भिमा सखाराम

३९. मा.गवळी शशीकिरण

४०. मा.तानाजी विठ्ठल खाडे

४१. मा.सुमनताई मधुकर पवळे

४२. मा.कुमार आर. एस.

४३. मा.सौ. नंदा विकास ताकवणे

४४. मा.उल्हास शेट्टी

४५. मा.जावेद शेख

४६. मा.भालेराव ज्ञानेश्वर निवृत्ती

४७. मा.कुटे गोपाळ नाना

४८. मा.शरद उर्फ राजू मिसाळ

४९. मा.भोंडवे तुकाराम महादू

५०. मा.गणेश तुकाराम भोंडवे

५१. मा.साळुंके राजेंद्र गुलाबराव

५२. मा.सौ. आशा ज्ञानेश्वर सुर्यवंशी

५३. मा.भाऊसाहेब सोपानराव भोईर

५४. मा.आण्णा दादू बनसोडे

५५. मा.तिकोने हरिभाऊ किसन

५६. मा.अपर्णा निलेश डोके

५७. मा.गावडे जयश्री वसंत

५८. मा.गुरुबक्ष किसनदास पहलानी

५९. मा.रामआधार धारिया

६०. मा. ॲड. अमर साधूराम मुलचंदानी

६१. मा.सौ.वाघेरे उषा संजोग

६२. मा.वाघेरे प्रभाकर नामदेव

६३. मा.विठ्ठल ऊर्फ नाना काटे

६४. मा.बाळासाहेब उर्फ खंडुशेठ दगडु कोकणे

६५. मा.भाऊ उर्फ कैलास गबाजी थोपटे

६६. मा.तापकीर मच्छिंद्र भाऊसाहेब

६७. मा.भारती ज्योती सुखलाल

६८. मा.कोकणे संतोष अंकुश

६९. मा.सुतार विजया विजय

७०. मा.दरेकर सतीश दगडू

७१. मा.आण्णा ऊर्फ मनोहर पवार

७२. मा.बारणे संतोष नागु

७३. मा.बारणे सिध्देश्वर बाळासाहेब

७४. मा.बारणे श्रीरंग चंदु ऊर्फ आप्पा

७५. मा.कलाटे कमल तानाजी

७६. मा.आदियाल (शीख) शोभा गुरुमितसिंग

७७. मा.सौ. नांदगुडे सुजाता विलास

७८. मा.खोमणे लता हनुमंत

७९. मा.ढोरे उषा ऊर्फ माई मनोहर

८०. मा.अशोकभाई सोनवणे

८१. मा.सौ. गारवे सावित्री किशोर

८२. मा.सौ. जगताप कल्पना कैलास

८३. मा.जगताप शंकर पांडुरंग

८४. मा.धराडे शकुंतला भाऊसाहेब

८५. मा.एकनाथ मोटे

८६. मा.सौ. गावडे सुषमा गोविंद

८७. मा.गायकवाड सुरदास तुकाराम

८८. मा.काटे राजेंद्र भिकनशेठ

८९. मा.नितीन ऊर्फ सनी रामचंद्र ओव्हाळ

९०. मा.सोनकांबळे चंद्रकांता लक्ष्मण

९१. मा.सुपे भाऊसाहेब रामभाऊ

९२. मा. हनुमंत बाळासाहेब गावडे

९३. मा. उत्तम मुक्ताजी हिरवे

९४. मा. विनायक सुरेश रणसुभे

याशिवाय मा.डुंबरे-अति.आयुक्त, मा.काळे-नगरसचिव,हे अधिकारी सभेस उपस्थित होते.

--------------------

मा.महापौर :- उपस्थित मा.नगरसेवक व नगरसेविका, आयुक्त, अधिकारी वर्ग, पत्रकार, नागरिक या सर्वांचे स्वागत करुन सभा कामकाजाला सुरुवात करणेत येत आहे.

पिंपरी चिंचवड मनपा हद्दी बाहेरील वाकड येथील कासारसाई जकात नाक्यापासुन आय.टी.पार्क हिंजवडीकडे जाणा-या पर्यायी रस्त्याचे मजबुतीकरण करणे (हद्दीबाहेरचे काम) कामी येणारे खर्चास प्रशासकीय मान्यता देणेकामीचा मा.आयुक्त यांचा प्रस्ताव सभा कामकाजात दाखल करुन घेणेची मा. आयुक्त यांची मागणी मतास टाकणेत आली असता -

अनुकूल -८० प्रतिकूल -०

अशी मते पडली व सदरचा विषय सभा कामकाजात दाखल करुन घेणेत

आला असल्याचे मा.महापौर यांनी प्रकट केले.

---------

मा.ज्ञानेश्वर भालेराव :- मा.महापौर साहेब, विषयाची माहिती उगिले साहेबांनी द्यावी.

मा.महापौर :- विषय दाखल करुन घेण्यात आलेला आहे, शासनाचे अनुदान आहे. उगिले साहेबांच्या मातोश्री वारलेल्या आहेत त्यामुळे ते आलेले नाहीत.
मा.ज्ञानेश्वर भालेराव :- मा.महापौर साहेब दुस-या अधिका-यांनी उत्तर द्यावे.
मा.महापौर :- विषय दाखल करण्यात आलेला आहे.

मा.आझमभाई पानसरे :- मा.महापौर साहेब, याठिकाणी चुकिची पध्दत पडत चाललेली आहे. किती लाड करायचे त्याला सुध्दा मर्यादा असते. महापालिकेमध्ये जीबी सर्वोच्च असते. आज नगरसेवक असतील किंवा अधिकारी असतील पहिला मान जीबीचा आहे. जीबी पेक्षा कोणीही मोठे नाही. अधिका-यांना असे वाटत असेल ते मोठे आहेत म्हणून, तर मनपाच्या अधिका-यांचा निषेध म्हणून सभा तहकूब करावी अशी सूचना मी मांडतो.

मा.अमर मुलचंदानी :- मा.महापौर साहेब, सूचनेस मी अनुमोदन देतो. अधिका-यांचा निषेध करतो त्यांनी हाऊसची माफी मागीतल्याशिवाय पुढची जीबी चालू करु नये.
मा.श्रीरंग बारणे :- मा.महापौर साहेब, आझमभाई पानसरे यांनी विषय मांडला त्याला पाठिंबा देतो. महापौर साहेब, आपण अधिकारी वर्गाला पाठिशी घालता असे सभागृहामध्ये निदर्शनास येते. महापालिकेची सभा चालू असताना संबंधित अधिका-यांनी सभागृहामध्ये उपस्थित राहणे गरजेचे आहे. आज सभागृहाचा किंवा केवळ सदस्यांचा अपमान नाहीतर संपुर्ण शहराचा अपमान आहे. सभागृहाचे सदस्य म्हणून जरा जरी स्वाभिमान असेलतर आम्ही निषेध करुन बाहेर जातो.

मा.महापौर :- सर्व अधिकारी याठिकाणी मागील बाजूच्या कक्षामध्ये बसलेले आहेत.
(गोंधळ)
मा.अमर मुलचंदानी :- मा.महापौर साहेब, अधिका-यांचा निषेध म्हणुन उदया दि.२१.४.२०१० रोजी दु.१.०० पर्यंत सभा तहकूब करावी.

मा.जावेद शेख :- मा.महापौर साहेब, अनुमोदन देतो.

मा.महापौर :- अधिका-यांना नवीन प्रथा पाडायची असेलतर सभागृहाला,महापौरांना त्याची माहिती द्यावी लागेल. पुणे महापालिकेमध्ये ज्याप्रमाणे अधिकारी सभागृहात बसत नाहीत बाजूच्या कक्षात बसतात त्याप्रमाणे आपल्या येथील अधिकारी मागील

बाजूच्या कक्षात बसले आहेत याचा मी खुलासा करणार होतो सदस्यांच्या भावना लक्षात घेता प्रशासनाने घेतलेला निर्णय हा संबंधिताना, पिठासिन अधिका-यांना देणे आवश्यक होते. निर्णय एकतर्फी घेतल्यामुळे प्रशासनाच्या निर्णयाचा निषेध म्हणून बुधवार दि. २१.४.२०१० रोजी दु. १.०० पर्यंत सभा तहकूब करणेत येत आहे.

-------

(बहल योगेश मंगलसेन)
महापौर
पिंपरी चिंचवड महानगरपालिका
पिंपरी - ४११ ०१८

पिंपरी चिंचवड महानगरपालिका, पिंपरी - ४११ ०१८

मा.महापालिका सभा

कार्यपत्रिका क्रमांक -४६

सभावृत्तांत
(दि. २०.४.२०१० ची तहकूब सभा)

दिनांक :- २१.०४.२०१०                                   वेळ :- दुपारी  १.०० वाजता

पिंपरी चिंचवड महानगरपालिकेची दि. २०.४.२०१० ची तहकूब मा.महापालिका सभा बुधवार दि.२१.४.२०१० रोजी दुपारी १.०० वा. महानगरपालिकेच्या प्रशासकीय इमारतीमधील यशवंतराव चव्हाण सभागृहात आयोजित करणेत आली होती. सभेस खालील सन्मा.सदस्य उपस्थित होते.

१. मा.बहल योगेश मंगलसेन            महापौर
२. मा.आसवानी डब्बु                 उपमहापौर
३. मा.भालेकर शांताराम कोंडीबा
४. मा. घुले रघुनंदन रामभाऊ
५. मा.जाधव विजया अशोक (मामी)
६. मा.सौ.अलकाताई बाळासाहेब यादव
७. मा.लोखंडे सुजाता सुनिल
८. मा.जाधव माऊली उर्फ ज्ञानेश्वर
९. मा.आल्हाट शांता महेंद्र
१०. मा.डॉ. सौ. मीना पाटील
११. मा.सौ.सारिकाताई संतोषभाऊ  लांडगे
१२. मा.सौ. बढे सुलोचना बबन

१३. मा.गवळी विजया पंडित

१४. मा.अजित दामोदर गव्हाणे

१५. मा.वसंत (नाना) आनंदराव लोंढे

१६. मा.महेश किसन लांडगे

१७. मा.फुगे  सुनंदाताई विजय

१८. मा.आशा अंकुश  लांडगे

१९. मा.मोहिनी विलास लांडे

२०. मा.लोंढे संतोष ज्ञानेश्वर

२१. मा.सौ. वर्षा विलास मडीगेरी

२२. मा.सावळे  सिमा

२३. मा.ननावरे जितेंद्र बाबासाहेब

२४. मा.भुंबे बाळासाहेब दिगंबर

२५. मा.डॉ.वैशालीताई  घोडेकर

२६. मा.राजेश उर्फ रामकृष्ण गोविंद स्वामी पिल्ले

२७. मा.यशवंत भोसले

२८. मा.सौ.गुंजेकर स्मिता रमेश

२९. मा. चौधरी अख्तरहुसेन तालुकदार

३०. मा.काळूराम मारुती पवार

३१. मा.आझम फकीरभाई पानसरे

३२. मा. चांदगुडे महेश गंगाराम

३३. मा.श्री.बाबर प्रकाश धरमसी

३४. मा.शेट्टी जगदिश

३५. मा.सौ. मंगलाताई अशोक कदम

३६. मा.बोबडे  भिमा  सखाराम

३७. मा.गवळी शशीकिरण

३८. मा.तानाजी विठ्ठल खाडे

३९. मा.उबाळे  वैशाली  संजय

४०. मा.सुमनताई  मधुकर पवळे

४१. मा.कुमार आर. एस.

४२. मा.सौ. नंदा विकास ताकवणे

४३. मा.उल्हास शेट्टी

४४. मा.जावेद शेख

४५. मा.भालेराव ज्ञानेश्वर निवृत्ती

४६. मा.कुटे गोपाळ नाना

४७. मा.शरद उर्फ राजू मिसाळ

४८. मा.भोंडवे तुकाराम महादू

४९. मा.गणेश तुकाराम भोंडवे

५०. मा.साळुंके राजेंद्र गुलाबराव

५१. मा.सौ. आशा ज्ञानेश्वर सुर्यवंशी

५२. मा.भाऊसाहेब सोपानराव भोईर

५३. मा.आण्णा दादू बनसोडे

५४. मा.तिकोने हरिभाऊ किसन

५५. मा.अपर्णा निलेश डोके

५६. मा.गावडे  जयश्री वसंत

५७. मा.रामआधार धारिया

५८. मा. ॲड. अमर साधूराम मुलचंदानी

५९. मा.सौ.वाघेरे उषा संजोग

६०. मा.वाघेरे प्रभाकर नामदेव

६१. मा.विठ्ठल ऊर्फ नाना काटे

६२. मा.बाळासाहेब उर्फ खंडुशेठ दगडु कोकणे

६३. मा.भाऊ  उर्फ  कैलास गबाजी थोपटे

६४. मा.तापकीर मच्छिंद्र भाऊसाहेब

६५. मा.भारती ज्योती सुखलाल

६६. मा.कोकणे संतोष अंकुश

६७. मा.सुतार विजया विजय

६८. मा.दरेकर सतीश दगडू

६९. मा.आण्णा ऊर्फ मनोहर पवार

७०. मा.बारणे संतोष नागु

७१. मा.बारणे सिध्देश्वर बाळासाहेब

७२. मा.बारणे श्रीरंग चंदु ऊर्फ आप्पा

७३. मा.आदियाल (शीख) शोभा गुरुमितसिंग

७४. मा.सौ. नांदगुडे सुजाता विलास

७५. मा.प्रशांत शितोळे

७६. मा.ढोरे उषा ऊर्फ माई मनोहर

७७. मा.अशोकभाई सोनवणे

७८. मा.सौ. गारवे सावित्री किशोर

७९. मा.सौ. जगताप कल्पना कैलास

८०. मा.जगताप शंकर पांडुरंग

८१. मा.धराडे शकुंतला भाऊसाहेब

८२. मा.सौ. गावडे सुषमा गोविंद

८३. मा.गायकवाड सुरदास तुकाराम

८४. मा.काटे राजेंद्र भिकनशेठ

८५. मा.नितीन ऊर्फ सनी रामचंद्र ओव्हाळ

८६. मा.सोनकांबळे चंद्रकांता लक्ष्मण

८७. मा.सुपे भाऊसाहेब रामभाऊ

८८. मा.थोरात एकनाथ दादा

८९. मा. हनुमंत बाळासाहेब गावडे

९०. मा. उत्तम मुक्ताजी हिरवे

९१. मा. विनायक सुरेश रणसुभे

९२. मा. प्रेमकुमार शंकरन नायर ऊर्फ बाबू नायर

याशिवाय मा.आशीष शर्मा-महापालिका आयुक्त, मा.डुंबरे-अति.आयुक्त, मा.देशमुख, मा.गायकवाड, मा.मुंढे-सहा.आयुक्त, मा.धाडगे-मुख्यलेखा परिक्षक, मा.काळे-नगरसचिव,मा.लोंढे-मुख्य लेखापाल, मा.सावळे-अति.अधिक्षक अभियंता, मा.पाटील-उपसंचालक (नगररचना),मा.चव्हाण-अति.शहर अभियंता, मा.तुपे-सह शहर अभियंता.मा.डॉ. कुणचगी-आरोग्य वैद्यकीय अधिकारी, मा.डॉ. अय्यर-वैद्यकीय संचालक,मा.गायकवाड-जनतासंपर्क अधिकारी हे अधिकारी सभेस उपस्थित होते.

--------------------

मा.महापौर :- उपस्थित मा.नगरसेवक व नगरसेविका, आयुक्त, अधिकारी वर्ग, पत्रकार, नागरिक या सर्वांचे स्वागत करुन सभा कामकाजाला सुरुवात करणेत येत आहे.

मा.अमर मुलचंदानी :- मा.महापौर साहेब, कालच्या जीबीत अधिकारी हाऊसमध्ये नव्हते म्हणून आम्ही निषेध करुन सभा तहकूब केलेली आहे. आज सभा चालू झालेली आहे कृपाकरुन अधिका-यांनी खुलासा करावा. काल याठिकाणी अधिकारी हजर न राहण्याचे कारण काय आहे व त्यामुळे दिलगिरी व्यक्त करावी आणि हाऊसचा मान ठेवावा.

मा.विनायक रणसुभे :- मा.महापौर साहेब, अनुमोदन देतो.

मा.महापौर :- नगरसचिवांनी खुलासा करावा. कालचा जो प्रकार घडला त्याची माहिती द्यावी.

मा.नगरसचिव :- मा.महापौर साहेब, मा.महापालिका सभा कार्यपत्रिकेवर एकूण १७ विषय आहेत. त्यापैकी ४ विषय नगरसचिव विभागाचे विशेष समित्यांचे सभावृत्तांत

कायम करण्याचे आहेत. ६ विषय प्रशासन विभागाचे ४ विषय नगररचना विभागाचे २ विषय भुयारी गटर योजना विभागाचे व १ विषय स्थापत्य अतिक्रमण विभागाचा आहे म्हणजे फक्त ५ विभागांच्या संबंधीत विषय आहेत व त्या व्यतिरीक्त प्रश्न जे आहेत ते गुंठेवारी/बांधकाम परवानगी/जकात या फक्त ३ विभागाच्या संबंधीत आहेत त्यामुळे मर्यादित प्रश्न व विषय असल्याने त्या संबंधातील मर्यादित अधिकारीच सभेकरीता उपस्थित होते व संबंधित अधिका-यांची संख्या मर्यादित असल्याने ते डायसच्या मागील बाजूस अधिका-यांची बैठक व्यवस्था आहे त्याठिकाणी बसले होते.तेथे त्यांना पुरेशी जागा होती त्यामुळे बहिष्कार म्हणुन अधिकारी/कर्मचारी नगरसेवकांकरीताच्या बैठक व्यवस्थेचे ठिकाणी बसले नाहीत असे झाले नाही पण तसा गैरसमज कम्युनिकेशन गॅपमुळे झाला. मुं.प्रां.मनपा अधिनियम १९४९ चे प्रकरण ३ मध्ये महानगरपालिका कामकाजाबाबत तरतुदी आहेत त्यातील पोट कलम २ अन्वये आयुक्तास महानगरपालिकेच्या सभेत उपस्थित रहाण्याचा व त्यामधे होणा-या चर्चेत भाग घेण्याचा पालिका सदस्याला जो अधिकार आहे तोच अधिकार असेल अशी तरतूद आहे परंतु असा अधिकार अन्य अधिका-यांस नाही त्यामुळे नवीन सभागृहात आयुक्तांना सभेत उपस्थितीसाठीची बैठक व्यवस्था व अन्य अधिका-यांना डायसच्या मागील बाजुच्या कक्षात बैठक व्यवस्था व त्यांना फर्माविल्यानंतर त्यांनी सभागृहात येवुन वस्तुस्थितीचे निवेदन/स्पष्टीकरण/माहिती देण्यासाठी डायसवर व्यवस्था ठेवणेत आली आहे अधिकारी/कर्मचारी यांनी नगरसवेकांकरीताच्या बैठक व्यवस्थेच्या ठिकाणी जावुन बसणे अपेक्षित नाही त्यामध्ये दुमत असण्याचे प्रयोजन नाही फक्त कम्युनिकेशन गॅपमुळे गैरसमजाला वाव मिळाला व त्यातून कालचा प्रसंग घडला यापुढे कम्युनिकेशन गॅप राहणार नाही याची खबरदारी घेणेत येईल.

मा.अमर मुलचंदानी :- मा.महापौर साहेब, हाऊसची दिशाभूल करण्याचा खुलासा केलेला आहे. आमचे अधिकार आम्हांला संागू नका. कालच कायदा झाला का आणि जी.आर.कुठला आहे. तुम्ही चुकलात हे स्पष्ट आहे तसे सांगावे. अधिका-यांच्या वतीने दिलगिरी व्यक्त करावी हाऊसची माफी मागीतली पाहिजे. हाऊसचा मान आपला मान आहे आणि आपला मान आमचा आहे. एवढे वर्षे अधिकारी याठिकाणी बसत होते हा कालच कायदा आला का. तसे असेलतर त्याचे सर्क्युलर सभासदाना द्यायचे होते. कोणीतरी एक-दोन माणसे यामध्ये जबाबदार आहेत त्यांची सुध्दा चौकशी करावी अधिका-यांनी दिलगिरी व्यक्त करावी त्याशिवाय आम्ही हाऊस चालू देणार नाही. अधिका-यांना दाखवायचे होते नगरसेवकांवर आम्ही एक्स्ट्रॅा दबाव टाकू, हे चालणार नाही. अधिका-यांना चॅलेंज करायचे असेलतर आम्ही दिलगिरी व्यक्त केल्याशिवाय जीबी चालू देणार नाही.

मा.आझमभाई पानसरे :- मा.महापौर साहेब, हा विषय आता अधिका-यांनी समजुतदारपणे घेतला पाहिजे. आपण चुकलो,आपली चुक मान्य करुन दिलगिरी

व्यक्त केली पाहिजे. विषयाला सुरवात झाली, सगळेजण बोलायला लागलेतर विषयाला वेगळी कलाटणी लागेल. आता नगरसचिवांनी संागीतले, सभागृहामध्ये पिठासिन अधिकारी म्हणून महापौरांचे अधिकार सर्वोच्च मानले जातात. काल महापौरांनी संागीतल्यानंतर सुध्दा तुम्ही त्याची अंमलबजावणी का केली नाही. नगरसचिव मोठे का आयुक्त मोठे का महापौर मोठे याचे उत्तर नगरसचिवांनी द्यावे.
मा.नगरसचिव :- मा.महापौर साहेब, मा.महापौर साहेबांनी आदेश दिले होते. अधिकारी मा.आयुक्तांच्या नियंत्रणाखाली काम करतात, माझ्या नियंत्रणाखाली काम करत नाहीत त्यामुळे त्यांना सुचना द्यायचा अधिकार माझ्याकडे येत नाही.
मा.अशोक सोनवणे :- मा.महापौर साहेब,काळे साहेबांनी खुलासा केला आहे. त्यामध्ये सभागृहाच्या बैठकीत सदस्यांस बसायची व्यवस्था असते अधिकारी येवू शकत नाहीत अशी व्यवस्था असेलतर तीकडच्या रांगेत अधिका-यांची व्यवस्था का केलेली आहे. खुलासा पटत नाही. तीकडच्या रांगेत सुध्दा माईक लावले असते.
मा.अमर मुलचंदानी :- मा.महापौर साहेब, या हाऊस मुख्य कोण आहे हे संागावे. महापौर का, आयुक्त का नगरसचिव हे संागावे.
मा.नगरसचिव :- मा.महापौर साहेब, महापालिका सभेचे अध्यक्ष म्हणून जे काही अधिकार आहेत ते मा.महापौरांचे आहेत परंतु जे निर्णय होतात त्याच्या अंमलबजावणीचे अधिकार मा.आयुक्तांचे आहेत.
मा.आझमभाई पानसरे :- मा.महापौर साहेब, नगरसचिवांनी कायदा शिकवायची गरज नाही. काल कसे काय चुकले हे समजत नाही. त्यांना काल अधिका-यांना बोलावून घ्यावे असे संागीतले होते त्यांनी ती चुक मान्य करावी. आता मान्य केलीतरी जीबी होईल. अधिका-यांनी दिलगिरी व्यक्त केल्याशिवाय जीबी होणार नाही. जेव्हापर्यंत अधिकारी माफी मागणार नाहीत तेव्हापर्यंत जीबी होणार नाही.
मा.श्रीरंग बारणे :- मा.महापौर साहेब, खरेतर काळे साहेबांनी जो खुलासा केला त्या खुलाशाशी मी सूध्दा सहमत नाही. सभागृहामध्ये अधिका-यांना बसण्यासाठी आसन व्यवस्था केलेली आहे. जुन्या महापालिका सभागृहामध्ये जागा कमी पडत होती अधिकारी त्याठिकाणी बसत नव्हते सदस्यांच्या संख्येपुरती जागा होती. साडेबारा कोटी खर्च करुन हे सभागृह बांधलेले आहे. सर्व याठिकाणी बसू शकतात.
अधिकारी आणि नगरसेवकांमध्ये दुरावा निर्माण करण्याचे काम प्रशासनाने केलेले आहे. उदया सभागृहाने निर्णय घेतला, एखादया अधिका-यांवर कार्यवाही करण्याचे सभागृहाने ठरविलेतर, त्यांचे निलंबन ठरवायचा तो अधिकार सभागृहाचा राहील. दुरावा प्रशासन आणि सभागृह यात झालातर याठिकाणी जे अधिकारी चुकले त्यांच्या निलंबनाचा निर्णय घेवू. चुकलेतर शासन झाले पाहिजे. भविष्यामध्ये आपल्यात दुरावा होवू नये, हा विषय याठिकाणी संपवावा अन्यथा या विषयाला फाटे फुटतील. जो

अधिकारी यापुढे चुकेल त्याला शासन करण्याचे काम सभागृह करेल. आपल्यामध्ये दुरावा राहता कामा नये.

मा.महापौर :- आयुक्तांना आणि सर्व अधिका-यांना मी सांगु इच्छितो की दोन दिवसापुर्वी जी घटना घडली होती त्यासाठी आमचे नगरसेवक गायकवाड व महाडीक साहेब यांच्या संदर्भात मी पुढाकार घेवून सर्व गटनेत्यांना,सर्वाना एकत्रित घेवून आम्ही आमच्या वतीने झालेल्या कृत्याबद्यल या नगरीचा महापौर असल्याने,माझा संबंध नसताना मी दिलगिरी व्यक्त केली आहे आणि वर्तमानपत्रामध्ये छापून आलेले आहे. वास्तविक पाहता मी दिलगिरी व्यक्त करण्याचा सबंध नव्हता परंतु माझ्या सहका-या कडून चुक झाली म्हणून मी दिलगिरी व्यक्त केली आणि हा विषय मिटवावा म्हणून सांगीतले होते. आताच अभियंत्यांच्या वतीने माझ्याकडे लोक आलेले होते त्यांनीही सांगीतले हे प्रकरण मिटले म्हणून व कामगार संघटनेच्या लोकांनी सुध्दा प्रकरण मिटले असे सांगीतले. आपल्याला पहिल्यांदा हा कायदा राबवायचा होतातर याची कल्पना पिठासिन अधिकारी म्हणून मला द्यायला पाहिजे होती ती दिलेली नाही. याला जबाबदार प्रशासन आहे. तरी सुध्दा सभागृहाच्या सदस्यांची मानसीकता नव्हती. सभागृहामधून सर्व बाहेर पडले तरी हा गैरसमज दूर व्हावा म्हणून मी बसून होतो. त्यावेळेला मी आदेश दिले होते की तुम्ही अधिका-यांना आतमध्ये बोलवावे त्यावेळेला बोलावले असतेतर हा विषय शांत झाला असता. परंतु तुम्ही डुंबरे साहेबांकडे ढकलले. ते म्हणाले काळे साहेब तुम्हांला बोलले नाहीत का. माझ्या उजव्या हाताला नगरसचिव आहेत आणि डाव्या हाताला आयुक्त आहेत. तरी शंभर टक्के प्रशासनाकडून झालेली चुक मान्य करुन हा विषय संपवावा.

मा.आयुक्त :- मा.महापौर साहेब, हा कालचा जो प्रकार घडला त्याच्या बद्यल सर्व मा.सदस्यांनी आपल्या भावना व्यक्त केल्या आहेत. जीबीमध्ये यायचे नाही म्हणून मुद्यामहुन असे प्लॅनिंग नव्हते. चुक एवढी आहे त्यांनी महापौरांना सांगायला पाहिजे होते. सर्वाना कल्पना दिली असतीतर विषय मिटला असता. महापौर साहेबांनी ऑर्डर दिली तेव्हा त्याचे पालन केले पाहिजे होते. याठिकाणी कोणीही येणार नाही असे अजीबात ठरलेले नाही. अति.आयुक्त याठिकाणी होते, नगरसचिव होते,बाकी स्टाफ होता आणि ज्या अधिका-यांचे विषय होते ते मागच्या रुम मध्ये बसले होते. सिटि इंजिनिअर असतील किंवा प्रशासनाचे देशमुख असतील ते सर्व मागच्या रुममध्ये बसतात. हा कम्युनिकेशन गॅप आहे, सभागृहाचा अपमान करायचा असे नव्हते. हे एक्सप्लेशन मान्य करुन सभागृहाचे काम चालू करावे अशी विनंती करतो.

मा.ज्ञानेश्वर भालेराव :- मा.महापौर साहेब, काल आपण सभात्याग केला. अधिका-यांनी त्यातून काही बोध घेतला असेल असे वाटले पण तसा काही प्रकार घडला नाही. परवा आपण सर्वानी एकत्रित येवून दिलगिरी व्यक्त केलेली होती. गेल्या २४ वर्षात अधिकारी बाहेर बसलेले नव्हते. परवाचा प्रकार घडल्यानंतर कालच बाहेर बसण्याचा प्रकार का घडला, ती चुक कबुल करत नाहीत हे बरोबर नाही. यात प्रशासनाचे अधिकारी जे कोणी असतील त्यांच्यावर कठोर कार्यवाही करावी त्यांच्यावर निलंबनाची कार्यवाही करावी.

मा.नगरसचिव :- मा.महापौर साहेब, आताच मा.आयुक्त यांनी सांगीतल्याप्रमाणे जो कम्युनिकेशन गॅप राहिला त्याच्याबद्दल दिलगिरी व्यक्त करण्यात येत आहे.

मा.महापौर :- दिलगिरी व्यक्त केलेली आहे.

मा.अमर मुलचंदानी :- मा.महापौर साहेब, हाऊसच्या वतीने विनंती करतो काळे साहेबांनी पेपर वाचला हे मान्य नाही. सगळे अधिकारी याच्यापुढे हाऊसमध्ये बसणार आहेत. हे आमच्यावर लादु नये. आम्ही हे ॲक्सेप्ट करणार नाही. सगळे अधिकारी हाऊसमध्ये बसणार हे पहिल्यांदा जाहिर करावे.

मा.महापौर :- पुर्वीप्रमाणे जी प्रथा आहे ती चालू राहिल. असा काही प्रकार असेलतर महापौर या नात्याने मला कळविणे ही तुमच्यावर जबाबदारी राहिल.

मा.उषा ढोरे :- मा.महापौर साहेब, महापालिकेचे माजी परिवहन समिती सभापती व माजी नगरसेवक- रंगनाथ शितोळे, माजी खासदार कै.शंकरराव पाटील यांच्या पत्नी- लीलावती पाटील, ज्येष्ठ नगरसदस्य व माजी महापौर आझमभाई पानसरे यांचे चुलते- युसुफभाई पानसरे, महापालिकेचे शहर अभियंता श्री.एकनाथ उगिले यांच्या मातोश्री-मुक्ताबाई पांडुरंग उगिले, विख्यात साहित्यिक- बाळ गाडगीळ, ज्येष्ठ रंगकर्मी- मोहन वाघ, ज्येष्ठ कवी-अनंत पाटील, ज्येष्ठ समीक्षक व साहित्यिक- म.वि.राजाध्यक्ष, दैनिक इंडियन एक्सप्रेसचे पिंपरी-चिंचवडचे वार्ताहर मनोहर मोरे यांचे वडिल- दत्तात्रय मोरे, मनपा विदयुत विभाग कर्मचारी- बाबा सदाशिव भालेराव , सुमन मारुती जांभूळकर, वॉर्ड क्र. २९ अजमेरा कॉलनी येथील- राजेश शांताराम भोसले व पप्पू रामन, रामचंद्र पाटील-चिंचवड, तुकाराम वाल्हेकर-वाल्हेकरवाडी यांचे दु:खद निधन झाले असल्याने त्यांस तसेच नक्षलवाद्याच्या हल्ल्यात ठार झालेल्या जवानांस श्रध्दांजली अर्पण करणेत यावी व सभा तहकुब करणेत यावी.

मा.विजया सुतार :- मा.महापौर साहेब, अनुमोदन देते.

मा.महापौर :- आपल्या सभागृहातील ज्येष्ठ नगरसेवक व सांगवी गावचे माजी सरपंच, या महापालिकेमध्ये तीन वेळेस निवडून आलेले सदस्य,पीसीएमटीचे माजी सभापती रंगनाथ शितोळे व इतर मान्यवरांना सर्वांनी दोन मिनिटे स्तब्ध उभे राहून श्रध्दांजली अर्पण करावी.

( सर्वांनी दोन मिनिटे स्तब्ध उभे राहून श्रध्दांजली अर्पण केली.)

------------

मा.महापौर :- उपस्थित सन्मा.सदस्यांच्या भावना विचारात घेवुन त्यांच्या संमतीप्रमाणे बुधवार दि. २१.०४.२०१० रोजी दुपारी १.५० पर्यंत सभा तहकूब करणेत येत आहे.

(बहल योगेश मंगलसेन)
महापौर
पिंपरी चिंचवड महानगरपालिका
पिंपरी-४११ ०१८.

# पिंपरी चिंचवड महानगरपालिका, पिंपरी - ४११ ०१८

## मा.महापालिका सभा

## कार्यपत्रिका क्रमांक -४६

## सभावृत्तांत

(दि. २०.४.२०१० व २१.४.२०१० (दु.१.००) ची तहकूब सभा)

दिनांक :- २१.०४.२०१० वेळ :- दुपारी १.५० वाजता

पिंपरी चिंचवड महानगरपालिकेची दि. २१.४.२०१० (दु.१.००) ची तहकूब मा.महापालिका सभा बुधवार दि.२१.४.२०१० रोजी दुपारी १.५० वा. महानगरपालिकेच्या प्रशासकीय इमारतीमधील यशवंतराव चव्हाण सभागृहात आयोजित करणेत आली होती. सभेस खालील सन्मा.सदस्य उपस्थित होते.

१. मा.बहल योगेश मंगलसेन महापौर
२. मा.आसवानी डब्बु उपमहापौर
३. मा.भालेकर शांताराम कोंडीबा
४. मा. घुले रघुनंदन रामभाऊ
५. मा.जाधव विजया अशोक (मामी)
६. मा.दत्तात्रय बाबुराव साने
७. मा.जाधव माऊली उर्फ ज्ञानेश्वर
८. मा.आल्हाट शांता महेंद्र
९. मा.डॉ. सौ. मीना पाटील
१०. मा.सौ. बढे सुलोचना बबन
११. मा.गवळी विजया पंडित
१२. मा.अजित दामोदर गव्हाणे

१३. मा.महेश किसन लांडगे

१४. मा.मोहिनी विलास लांडे

१५. मा.लोंढे संतोष ज्ञानेश्वर

१६. मा.सौ. वर्षा विलास मडीगेरी

१७. मा.सावळे सिमा

१८. मा.ननावरे जितेंद्र बाबासाहेब

१९. मा.भुंबे बाळासाहेब दिगंबर

२०. मा.डॉ.वैशालीताई घोडेकर

२१. मा.राजेश उर्फ रामकृष्ण गोविंद स्वामी पिल्ले

२२. मा.यशवंत भोसले

२३. मा.सौ.गुंजेकर स्मिता रमेश

२४. मा. चौधरी अख्तरहुसेन तालुकदार

२५. मा.काळूराम मारुती पवार

२६. मा.आझम फकीरभाई पानसरे

२७. मा.श्री.बाबर प्रकाश धरमसी

२८. मा.शेट्टी जगदिश

२९. मा.सौ. मंगलाताई अशोक कदम

३०. मा.बोबडे भिमा सखाराम

३१. मा.गवळी शशीकिरण

३२. मा.तानाजी विठ्ठल खाडे

३३. मा.सुमनताई मधुकर पवळे

३४. मा.कुमार आर. एस.

३५. मा.उल्हास शेट्टी

३६. मा.भालेराव ज्ञानेश्वर निवृत्ती

३७. मा.कुटे गोपाळ नाना

३८. मा.शरद उर्फ राजू मिसाळ

३९. मा.भोंडवे तुकाराम महादू

४०. मा.गणेश तुकाराम भोंडवे

४१. मा.साळुंके राजेंद्र गुलाबराव

४२. मा.सौ. आशा ज्ञानेश्वर सुर्यवंशी

४३. मा.भाऊसाहेब सोपानराव भोईर

४४. मा.आण्णा दादू बनसोडे

४५. मा.तिकोने हरिभाऊ किसन

४६. मा.थोरात एकनाथ दादा

४७. मा.रामआधार धारिया

४८. मा. ॲड. अमर साधूराम मुलचंदानी

४९. मा.सौ.वाघेरे उषा संजोग

५०. मा.वाघेरे प्रभाकर नामदेव

५१. मा.विठ्ठल ऊर्फ नाना काटे

५२. मा.बाळासाहेब उर्फ खंडुशेठ दगडु कोकणे

५३. मा.भाऊ उर्फ कैलास गबाजी थोपटे

५४. मा.भारती ज्योती सुखलाल

५५. मा.कोकणे संतोष अंकुश

५६. मा.सुतार विजया विजय

५७. मा.दरेकर सतीश दगडू

५८. मा.आण्णा ऊर्फ मनोहर पवार

५९. मा.बारणे संतोष नागु

६०. मा.बारणे सिध्देश्वर बाळासाहेब

६१. मा.बारणे श्रीरंग चंदु ऊर्फ आप्पा

६२. मा.आदियाल (शीख) शोभा गुरुमितसिंग

६३. मा.ढोरे उषा ऊर्फ माई मनोहर

६४. मा.अशोकभाई सोनवणे

६५. मा.सौ. गारवे सावित्री किशोर

६६. मा.जगताप शंकर पांडुरंग

६७. मा.धराडे शकुंतला भाऊसाहेब

६८. मा.सौ. गावडे सुषमा गोविंद

६९. मा.गायकवाड सुरदास तुकाराम

७०. मा.काटे राजेंद्र भिकनशेठ

७१. मा.नितीन ऊर्फ सनी रामचंद्र ओव्हाळ

७२. मा.सोनकांबळे चंद्रकांता लक्ष्मण

७३. मा.प्रशांत शितोळे

७४. मा. उत्तम मुक्ताजी हिरवे

७५. मा. विनायक सुरेश रणसुभे

७६. मा. प्रेमकुमार शंकरन नायर ऊर्फ बाबू नायर

याशिवाय मा.आशीष शर्मा-महापालिका आयुक्त, मा.डुंबरे-अति.आयुक्त, मा.देशमुख, मा.गायकवाड, मा.मुंढे-सहा.आयुक्त, मा.धाडगे-मुख्यलेखा परिक्षक, मा.काळे-नगरसचिव,मा.लोंढे-मुख्य लेखापाल, मा.सावळे-अति.अधिक्षक अभियंता, मा.पाटील-उपसंचालक (नगररचना),मा.चव्हाण-अति.शहर अभियंता, मा.तुपे-सह शहर अभियंता.मा.डॉ. कुणचगी- आरोग्य वैद्यकीय अधिकारी, मा.डॉ. अय्यर-वैद्यकीय संचालक,मा.गायकवाड-जनतासंपर्क अधिकारी हे अधिकारी सभेस उपस्थित होते.

(रोहित मोटवाणी,दिपक शिळमकर व संग्राम चौगूले यांचा विशेष कार्याबद्यल सत्कार करणेत आला.)

अ) मा.महापालिका सभा क्र.४४ दि.२०/०३/२०१० चा सभावृत्तांत कायम करणेत आल्याचे मा.महापौर यांनी प्रकट केले.

ब) मा.विशेष महापालिका सभा क्र.४५ दि.२०/०३/२०१० (दु.१.०० व १.५०) चा सभावृत्तांत कायम करणेत आल्याचे मा.महापौर यांनी प्रकट केले.

--------------------

मा.नगरसचिव :- प्रश्नोत्तरे-मा.विनायक रणसुभे यांना विचारावयाचे प्रश्न.

मा.विनायक रणसुभे :- मा.महापौर साहेब, आमच्या येथे संरक्षण खात्याची २ हजार यार्डाची चतु:सिमा केलेली आहे. मोरेवस्ती, म्हेत्रेवस्ती,ताम्हाणेवस्ती या भागात सुरवातीला ५०० यार्ड,७०० यार्ड अशी चतु:सिमा होती. बांधकाम परवानगी किंवा गुंठेवारीचे प्रकरण असेलतर या भागातील नागरीकांना साधा झोन दाखला सुध्दा मिळत नाही. निदान गुंठेवारी झालीतर कर्जतरी मिळत होते. हे सर्व मार्ग सर्वसामान्य नागरीकांचे बंद झालेले आहेत. हे २००० यार्डाचा रेफरन्स देतात त्यामध्ये तीन वेगवेगळया संस्था काम करतात. देहूरोड कॅण्टोन्मेंट बोर्डाने ५०० यार्डाच्या आत बांधकाम परवानगी दिलेली आहे. एमआयडीसीने तळवडे मध्ये सिन्टेल सारख्या आयटी कंपनीला बांधकाम परवानगी दिलेली आहे तुम्ही सांगता शासनाचे पत्र आहे, मी प्राधिकरणाला विचारलेतर ते म्हणाले अशाप्रकारचा कुठलाही नकाशा आणि माहिती उपलब्ध नाही. बांधकाम परवानगी देतो का असे मी विचारलेतर त्यांनी सांगीतले पेठ क्र.१९ व २० या भागाची विकास योजना शासनाने मंजूर केलेली आहे त्यानुसार परवानगी देण्यात येत आहे. महाराष्ट्र शासनाच्या अखत्यारीत पिंपरी चिंचवड महापालिका काम करते,एमआयडीसी काम करते व प्राधिकरण सुध्दा काम करते. दोन संस्था परवानगी देतात आणि पिंपरी चिंचवड महापालिका सर्वसामान्य नागरीकांस वेठीस धरण्याचे काम करते. से-२२ येथे झोपडपट्टीचे पुनर्वसन केलेले आहे ती सुध्दा संरक्षण खात्याच्या जवळ असलेली इमारत आहे. त्याठिकाणी संरक्षण खात्याने २ हजार यार्डाची निश्चिती केलीतर तुम्ही केलेले पुनवर्सन सुध्दा बेकायदेशिर राहिल. एक नियम प्रशासनासाठी आणि दुसरा नियम नागरीकांसाठी असे करुन चालणार नाही. संपुर्ण शहरासाठी एकच निर्णय आपल्याला घ्यावा लागेल. संरक्षण खात्याकडे पत्रव्यवहार चालू आहे. महापालिका से-२२ ला पुनर्वसन करत असेलतर प्राधिकरणसारखी संस्था परवानगी देत असेलतर, एमआयडीसी परवानगी देत असेलतर सर्वसामान्य नागरीकांसाठी धोरणात्मक निर्णय घ्यावा. मोरेवस्ती, म्हेत्रेवस्ती, ताम्हाणेवस्ती या भागातील झोन दाखला,परवानगी थांबवली आहे याचे निश्चितीकरण होण्यासाठी जो नियम से-२२ साठी वापरला तसा नियम याठिकाणी वापरुन सर्वसामान्य नागरीकांना समान न्याय द्यावा, दुजाभाव करु नये याबाबत आयुक्तांच्या अधिकारामध्ये निर्णय घेता येत असेलतर तो लवकरात लवकर घ्यावा.

मा.श्रीरंग बारणे :- मा.महापौर साहेब, से-२२ मध्ये झोपडपट्टी पुनर्वसन प्रकल्प राबविला जातो तो २ हजार यार्डामध्ये येतो असे विनायक रणसूभे यांनी सांगीतले

आहे. महापालिकेनी हा प्रकल्प राबवित असताना शासनाची,संरक्षण खात्याची परवानगी घेतली का ? आणि जर घेतली असेलतर त्याचा खुलासा करावा व हा प्रकल्प २ हजार यार्डामध्ये येतो का हे सांगावे याठिकाणी संरक्षण खात्यानी तशाप्रकारचे रेखांकन केलेले आहे. कोटयावधी रुपयाचे काम महापालिकेच्या वतीने केंद्रशासनाच्या व राज्यशासनाच्या माध्यमातून JNNURM अंतर्गत केलेले आहे. याबाबतीत काही कळविलेले आहे का ? हा प्रकल्प संरक्षण खात्याच्या रेडझोनमध्ये येतो का, याबाबत खुलासा करावा.

मा.अविनाश पाटिल (उपसंचालक नगररचना) :- मा.महापौर साहेब, २ हजार यार्डाबद्यलचे नोटिफिकेशन कम्युनिकेट झाले. त्याच्यानंतर परमिशन दिलेली नाही. २ हजार यार्ड कुठपर्यंत आहेत त्याचा नकाशा सोबत जोडला आहे असे गॅझेटमध्ये म्हणलेले होते परंतु तो नकाशा कुठेही नव्हता. हे २ हजार यार्ड कुठपर्यंत आहेत हे दाखवा असे आम्ही विचारले परंतु तो नकाशा दिलेला नाही. २ हजार यार्ड म्हणल्यानंतर से-२२ येथील भाग अंतर्भूत होतो. मा.आयुक्त यांच्या लेव्हलला ब-याच बैठका झालेल्या आहेत. बोर्डाचे जे ठराव झालेले आहेत त्यात ५०० ते ६०० यार्डाची शिफारस झाली त्याच्यानंतर २ हजार यार्ड झाले. लोकांना मोबदला देण्याबाबत मा.आयुक्त यांनी सेक्रेटरी-युडी यांना विनंती केलेली होती. २००८ साली महाराष्ट्र शासनाच्या लेव्हलला बैठक झाली. त्यात असे समजते की ११४५ मीटरचा रिव्हाईज प्रस्ताव ठेवला आहे त्याला अंतीम मान्यता मिळणे बाकी आहे.

मा.श्रीरंग बारणे :- मा.महापौर साहेब, से.२२ मध्ये जो प्रकल्प चालू होता तो रेडझोनमध्ये येत असताना JNNURM अंतर्गत हा प्रकल्प केंद्रशासनास, राज्यशासनास सादर केला त्यावेळेला शासनाला सांगीतले होते का की हा प्रकल्प रेडझोनमध्ये येतो.

मा.मदनमोहन सावळे (अति.अधिक्षक अभियंता ) :- मा.महापौर साहेब,झोपडपट्टी पुनर्वसन प्रकल्प से-२२ मध्ये आहे त्यास SRA ॲथॉरिटीची मंजूरी घेतलेली आहे.

मा.श्रीरंग बारणे :- मा.महापौर साहेब,या सगळया परवानग्या आपल्या बांधकाम विभागाकडे आज सुध्दा पडून आहेत. प्रविणसिंह परदेशी झोपडपट्टी पुनर्वसन योजनेचे ज्यावेळेला अध्यक्ष होते त्यावेळेला त्यांच्या एका पत्रावर सर्व अटि व शर्ती पुर्ण करुन परमिशन देण्यात येत आहे अशाप्रकारचे पत्र आहे. एका पत्रावर परमिशन दिलेले आहे. महापालिका हद्यीमध्ये परमिशन देत असताना सुसंगत नकाशा सादर करावा लागतो, बांधकाम परवानगीस सगळा प्लॅन सादर करावा लागतो नंतर परवानगी द्यावी लागते. महापालिकेकडून राबविल्या गेलेल्या झोपडपट्टी पुनर्वसन योजनेच्या जवळपास तीन स्किम बेकायदेशिरपणे चालू आहेत. आता सावळे साहेबांनी खुलासा केला आहे तो चुकिचा आहे. एका शब्दामध्ये SRA ची परवानगी घेतली आणि काम चालू केले असे सांगीतले. से-२२ चा प्रकल्प रेडझोनमध्ये चालू

आहे, सर्वसामान्य नागरीकांना त्याठिकाणी बांधकाम परमिशन देण्यात येत नाही परंतु महापालिका अनधिकृतपणे काम करते. तशाचप्रकारे विठ्ठलनगरचे आहे. राज्यशासनाला नकाशा सादर केला आहे ते बांधकाम आण्णासाहेब मगर स्टेडीअमच्या जागेमध्ये चालू आहे. राज्यशासनाने रिझर्व्हेशन बदलण्यासाठी परमिशन दिलेली नाही. मिलिंदनगरचा प्रकल्प सुध्दा पुरनियंत्रण रेषेमध्ये आहे महापालिका अनधिकृतपणे काम करते. बांधकाम विभागाकडे या फाईली पडून आहेत. रिव्हाईज प्लॅनला मंजूरी देत नाहीत कारण चुकिच्या पध्दतीने बांधकाम केलेले आहे. शासनाच्या डोळयामध्ये धुळफेक करुन हा प्रकल्प चालू आहे.

मा.शांताराम भालेकर :- मा.महापौर साहेब, आपल्याकडे रेडझोनच्या संदर्भात डिफेन्सने कुठल्याही प्रकारची हद्द निश्चित केलेली नाही आपल्या महापालिकेचे काम त्यांच्या हद्दीमध्ये होते.  आमच्या परिसरामध्ये आयटी कंपन्याला परमिशन देतात आणि सर्वसामान्य नागरीकांची गूंठेवारी होत नाही किंवा परमिशन मिळत नाही. आमच्याकडे आयटी कंपन्याचे महापालिकेचे कामकाज चालू आहे. सर्वसामान्य नागरीकांस कुठल्याही प्रकारच्या गुंठेवारीस परमिशन मिळत नाही असे का ? याचा खुलासा करावा.

मा.विनायक रणसुभे :- मा.महापौर साहेब, महापालिकेच्या प्रोजेक्टला माझा विरोध नाही. मोरेवस्ती, म्हेत्रेवस्ती, ताम्हाणेवस्ती या भागातील प्रकरणे प्रलंबीत आहेत. या भागातील नागरीकांना गुंठेवारी व झोन दाखला देण्यासाठी धोरणात्मक निर्णय घ्यावा.

मा.शंकर जगताप :-  मा.महापौर साहेब, डिफेन्सने आपल्याला २ हजार यार्डाचा नकाशा दिलेला नाही. त्यामध्ये येणा-या कामाना आपण बंधन घालू शकतो का? त्यांची हद्द निश्चित न करता आपल्या हद्दीमध्ये जे काही कामकाजाना बंधन आहेत ते कायद्याने करु शकतो का.

मा.आयुक्त :- मा.महापौर साहेब, रेडझोनचा इश्यू आहे, याबद्यल कन्फ्यूजन आहे. रेडझोनबाबत डिफेन्स खात्याकडून डिफेन्स ॲक्टखाली हद्दीबाबत बंधने घातल्यानंतर संबंधित जागा मालकांना नुकसानभरपाई अठरा महिन्यात द्यावी लागते. जे नुकसान झाले त्याचे कलेक्टरमार्फत ॲवॉर्ड करायला पाहिजे ते या केसमध्ये झालेले नाही. नोटीफिकेशन सपोर्ट  नाही. नोटिफिकेशन परत इश्यू करावे लागेल व ते परत इश्यू करताना ११४५ मी. चे रिव्हाईज प्रपोजल केलेले आहे. आमच्या हातामध्ये डॉक्युमेंट नसल्यामुळे आम्ही परफेक्ट सांगू शकत नाहीत. परंतु ११४५ मी. झालेले आहे असे समजते. जीवीताशी संबंधित पण बाब असल्याने Risk घेता येत नाही शाळा स्मशानभूमी अशा काही केसमध्ये आम्ही डिसक्रिएशन वापरतो परंतु इतर केसमध्ये नाही. मा.शरद पवार ज्यावेळेला डिफेन्स मिनिस्टर होते त्यावेळेला या मुद्यावर चर्चा झालेली होती.

मा.अजीत गव्हाणे :- मा.महापौर साहेब, पुर्वी भोसरी,च-होली,मोशी,दिघी या परिसरामध्ये रेडझोनचा प्रश्न होता. त्यामध्ये ११४५ मी. हद्द होती. ११४५ मी. पर्यंत बिल्डींग परमिशन महापालिका देत नव्हती त्या अनुषंगाने नंतरच्या काळात रेडझोन सोडविण्याच्या संदर्भात मा.पवार साहेबांच्या मध्यस्थीने शासनाकडे मिटिंग झाली त्यामध्ये हद्द बदलण्याचा निर्णय झालेला आहे. त्याच्यामध्ये तीन स्टेजेस आहेत. ठराविक हद्दीपर्यंत कन्स्ट्रक्शन करु शकता नंतरच्या ठरावीक हद्दीपर्यंत लिमिट पर्यंत कन्स्ट्रक्शन करु शकता व त्या नंतरची जी हद्द आहे त्यामध्ये कुठल्याही प्रकारचे कन्स्ट्रक्शन अलाऊड नाही असे बंधनकारक आहे. या तीन स्टेजेसनुसार भोसरी,च-होलीची हद्द कमी करण्यात आलेली आहे. आता पाटिल साहेबांनी सांगीतले आहे की कुठेही हद्दीचा नकाशा नाही. असे असताना त्या परिसरातील लोकांवर अन्याय करतो आहोत. आपली प्रॉपर्टि आहे त्यास तुम्ही किंवा इतर संस्था बिल्डींग परमिशन देतात अशा परिस्थितीमध्ये त्या परिसरातील नागरीकांना गुंठेवारी करुन द्यावी त्यासाठी अंडरटेकिंग घ्यावे. रेडझोनची कंडीशन टाका व नागरीकांची गुंठेवारी झाली पाहिजे असे करा. ११४५ मी.च्या आतमध्ये जे रिझर्व्हेशन आहे त्यांना मोबदला देणार का व तो कशाप्रकारे देणार आहात. नागरीकांवर जो अन्याय होतो त्यामध्ये महापौर साहेब आपण पुढाकार घेवून लोकांची गुंठेवारी व्हावी असे प्रशासनास आदेश द्यावेत.

मा.आर.एस.कुमार :- मा.महापौर साहेब, आता दिलेला कुठलाही रिप्लाय पटत नाही. सर्वांना कायदा सारखा असायला पाहिजे. महापालिकेला एक कायदा, देहूरोड साठी एक कायदा,प्राधिकरणाला एक कायदा असे चालणार नाही. प्रोजेक्ट करताना तुमच्यासाठी एक कायदा व पब्लिकसाठी एक कायदा करता. हे करण्याच्या अगोदर शासनाची परवानगी घ्यायला पाहिजे होती. यामध्ये चौकशी झालीतर अधिकारी जेलमध्ये जावु शकतात, सर्वसामान्य नागरीकांसाठी एक कायदा आणि तुमच्यासाठी एक कायदा असे चालणार नाही. सर्वसामान्य नागरीकांची गुंठेवारी करावी, यामध्ये चौकशी करावी अनेक लोक जेलमध्ये जातील.

मा.विनायक रणसुभे :- मा.महापौर साहेब,पालकमंत्री यांनी नवीन गावातील डी.पी.मधील रस्ते ताब्यात घेण्यासाठी सांगीतले होते. त्या भागात रस्त्याने बाधीत होणा-या जागा मालकांना कुठल्याही प्रकारचा मोबदला देत नाहीत. भविष्यामध्ये ते रस्ते विकले गेलेतर लोक त्यावर घरे बांधतील. रेडझोन भागातील रस्त्यांविषयीतरी आपल्याला काहीतरी धोरणात्मक निर्णय आणि मोबदला देण्याचा निर्णय घ्यावा लागेल. सर्वसामान्य नागरीकांनी ती जागा विकत घेतलीतर ते बेघर होणार आहेत. त्या भागातील रस्त्याविषयीतरी तुम्ही आता धोरणात्मक निर्णय घ्यावा जेणेकरुन भविष्यामध्ये सर्वसामान्य नागरीकांचे नुकसान होणार नाही.

मा.महापौर :- आयुक्त साहेबांनी सांगीतले की ११४५ मी. बद्यल नोटीफिकेशन प्रलंबीत आहे, अंतिम निर्णय घ्यायला पाहिजे होता तो घेतलेला नाही. त्याठिकाणी शासनाचे सुध्दा रस्ते असतील, आरक्षण टाकलेले असेल त्याठिकाणी डीपी करत असताना राज्यशासनाने सुध्दा याच्या कॉम्पेनसेशन बद्यल म्हणणे लक्षात घेतले नाही. आयुक्त साहेबांचा मुद्या असा आहे की लोकांच्या जीवीताशी खेळायचे नाही परंतु झोपडपट्टीवासियाना त्याठिकाणी बसवतो आहोत शाळा बनवतो आहोत त्यांच्या जीवीताशी खेळतो आहोत ११४५ मी. ची प्रत मिळालेली नाही. माझी आयुक्तांना सुचना आहे की आपण डिफेन्सला पत्र द्यावे त्यात ४५ दिवसामध्ये उत्तर प्राप्त झाले नाहीतर मान्यता आहे असे समजून रितसर परवानगी देवू असे लिहावे.

मा.आझमभाई पानसरे :- मा.महापौर साहेब, आता आपण ४५ दिवसामध्ये निर्णय घ्यावा असे आपले मत मांडले हा अतीशय चांगला निर्णय आपण घेतलेला आहे. आयुक्त म्हणून अधिका-यांची बाजू घेणे रास्त आहे. आयुक्त प्रत्येकवेळेस अधिका-यांची बाजू घेतात, आम्हांला आयुक्तांकडून अपेक्षीत आहे की जे संबंधित अधिकारी हे काम पाहतात त्यात कोणी चुकत असेलतर त्याना सुध्दा सुधारले पाहिजे. फक्त सावरुन नेणे एवढेच काम आयुक्तांचे नसुन त्यांच्याकडून काम करुन घेतले पाहिजे.

मा.आयुक्त :- मा.महापौर साहेबांनी सुचना केलेली आहे त्याप्रमाणे आम्ही सुध्दा खुपवेळा पत्रव्यवहार केलेला आहे परंतु त्यांच्याकडून उत्तर येत नाही. सकारात्मक ॲटिटयूड येत नाही. वास्तविक पाहता त्यांनी डिसीजन घ्यायला पाहिजे. आता सांगीतल्याप्रमाणे ४५ दिवसात निर्णय घेतला नाहीतर आम्ही पुढची कार्यवाही करु असे त्यांना आम्ही पत्र देतो.

मा.महापौर :- नोटिफिकेशन लॅप्स झालेले आहे. हा फॉल्ट डिफेन्स आणि कलेक्टर यांचा आहे. त्या लोकांना कॉम्पेनसेशन मिळायला पाहिजे. ४५ दिवसापर्यंत वाट पाहू अन्यथा आम्ही आमच्या प्रमाणे परमिशन देवू असा उल्लेख त्या पत्रामध्ये करावा. एमआयडीसी,प्राधिकरण त्याठिकाणी परमिशन देते. ४५ दिवसामध्ये आपले उत्तर आले नाहीतर आपली मंजूरी आहे असे समजून आम्ही पुढील कार्यवाही करु असे सांगावे. विनायक रणसुभे यांचे प्रश्न संपले आहेत मा.अशोक सोनवणे व मा.सुलभा उबाळे यांना विचारावयाचे प्रश्न.

मा.अशोक सोनवणे :- मा.महापौर साहेब, दारु विक्रेत्यांनी आणि सोने-चांदी विक्रेत्यांनी चुकविलेल्या जकाती संदर्भात प्रश्न विचारलेले आहेत. आपण मागे करवाढ केलेली आहे. नवीन उपाय सुचविण्या बरोबरच आता जे कर आहेत ते पुर्ण क्षमतेने वसुल करण्यासाठी नेमकी किती थकबाकी आहे ती संपुर्ण वसुल करावी आणि त्यासाठी आपण काय करणार आहोत. नियमित कर वसुल केलातर भविष्यात करवाढीचा विचार करावा लागणार नाही. सोने-चांदीच्या संदर्भात ३६+८ जणांकडून १८६ कोटीची रक्कम आहे हा खुलासा मान्य आहे परंतु दारुविक्रेत्याबद्यल खुलासा

दिलेला आहे २९ कोटीची जकात चुकविलेली आहे, माझ्या माहितीप्रमाणे २००५ साली एक्साईज डिपार्टमेंटकडून माहितीच्या अधिकारामध्ये माहिती मागीतलेली होती त्यांनी माहिती दिलेली आहे. चार वर्षाची माहिती पुर्णपणे आलेली नाही ती आलीतर वाढ होईल असे वाटते. माझ्या माहितीप्रमाणे पहिल्यावर्षीची माहिती फक्त मागविलेली आहे पुढच्या चार वर्षाची आलेली आहे का याची माहिती मिळावी. संपुर्ण जकात वसुल केलीतर २०० ते २५० कोटी जकात आपल्याला मिळू शकते. याकरिता स्वतंत्र स्कॉड निर्माण करावा व त्या मार्फत हे वसुल करावे. एक्साईज डिपार्टमेंटकडून किती वर्षाची माहिती मिळालेली आहे याचा खुलासा करावा.

मा.श्रीरंग बारणे:-मा.महापौर साहेब, या शहरामध्ये २३८ दारु विक्रेते आहेत. त्यातील १६१ विक्रेत्यांनी जकात चुकविली आहे. ७७ विक्रेत्यांनी जकात चुकविलेली नाही. जकात चुकवेगिरीची संख्या मोठयाप्रमाणात आहे. लोकांना पाण्यासाठी वणवण फिरावे लागते आणि दारुमध्ये महापालिकेचे ३० कोटी अडकलेले आहेत. या दारुवाल्यांना एकत्रित घेवून ३० कोटी वसुल केलेतर निश्चितपणे महापालिकेचा फायदा होईल. प्रामुख्याने अशोक मुंढे, जकात अधिक्षक यांचे अभिनंदन करतो व त्यांना धन्यवाद देतो जकातचोरांना आळा घालण्याचे काम त्यांनी केलेले आहे. जकात नाक्याचा भरणा त्यांच्या कालावधीमध्ये वाढलेला आहे. येथून पाठिमागच्या काळामध्ये जकातनाक्यावर चोरी होत होती, दारुविक्रेते मोठया प्रमाणात चोरी करतात. १६१ जकात चुकवेगिरीमध्ये सापडलेले आहेत. जकात विभागाच्या कर्मचा-यांना, अधिका-यांना जकातनाक्यावर धमकावले जाते. त्याकडे सुध्दा आपण बारकाईने लक्ष घातले पाहिजे. दोन नंबरचे विक्रेते, दोन नंबरचे धंदे करणारे यामध्ये प्रामुख्याने मोठया प्रमाणात आहेत. अशोक सोनवणे यांना धन्यवाद देतो. जकात चुकवेगिरी विरोधात सभागृहाला माहिती मिळाली आहे.

मा.अशोक मुंढे (सहा.आयुक्त ) :- मा.महापौर साहेब, दारुविक्रेत्यांच्या बाबतीत सन २००५ मध्ये जकात विभागाने एक्साईज डिपार्टमेंट कडून माहिती मागविलेली आहे त्या अनुषंगाने सांगतो २३८ दारु विक्रेते आपल्या शहरामध्ये आहेत त्यापैकी १६१ विक्रेत्यांनी जकात चुकविलेली होती. आपल्या विभागाने सुरवातीला त्यांना दंड भरण्याबाबत नोटिस दिलेली होती नंतर दंड बिले बजावण्यात आली. ही रक्कम जवळपास २२ कोटीची एक वर्षाची आहे. १६१ पैकी १४१ हे २००५ मधील आहेत आणि बाकीचे दारुविक्रेते आहेत ते २००६ चे आहेत. याच पध्दतीने एक्साईज डिपार्टमेंटकडून माहिती घेतलेली होती आणि उर्वरीत जे दारुविक्रेते आहेत त्यांच्याकडून ७ कोटी दंडाची रक्कम येणे बाकी आहे. डिस्ट्रीक्ट कोर्टामध्ये केसेस दाखल केलेल्या होत्या त्यात १२४ केसेस महापालिकेच्या विरुध्द गेलेल्या आहेत. ज्या केसमध्ये दंडाची रक्कम २० हजारापेक्षा जास्त आहे अशा ५८ केसेसमध्ये महापालिकेनी हायकोर्टात अपिल दाखल केलेले आहे व उर्वरीत दारुविक्रेते आहेत

त्यांच्या दंडाची रक्कम २० हजारापेक्षा कमी असल्यामुळे अपिल दाखल केलेले नाही. १४१ पैकी ६२ दारुविक्रेत्यांनी मा. उच्च न्यायालयामध्ये रिटपिटिशन दाखल केले आहे उर्वरीत दुकानदाराच्या बाबतीत जप्तीची कारवाई सुरु आहे. आतापर्यंत २ दुकानदारा विरुध्द जप्तीची कारवाई केली आहे ती प्रक्रिया चालू आहे. या पध्दतीनेच पुढील सुध्दा माहिती एक्साईज डिपार्टमेंटकडून घेता येईल.

मा.महापौर :- श्रीरंग बारणे यांनी आपले अभिनंदन केले आहे. ब-याच केसेस आपल्या विरुध्द गेलेल्या आहेत. अशा ज्या केस आपल्या विरोधात जातात, गाडी पकडून याठिकाणी आणल्यानंतर ते लोक कोर्टामध्ये जातात तेथे जी काही जकात असेल ती भरण्याचा आदेश कोर्ट करते, नंतर आपण पुढील कार्यवाही करतो. असे लोक सुटणार नाहीत असा काहीतरी कायदा आहे का. नाक्यावर दादागिरी होते, त्याठिकाणी एजंट लोकांचा सुळसुळाट झालेला आहे. तेथील कर्मचा-यांना मदत अपेक्षीत असते. दंडात्मक कार्यवाही केल्या नंतर सुध्दा आपल्या विरोधात केसेस जातात याबद्यल कठोर कार्यवाही करण्यासाठी काय उपाययोजना कराव्या लागतील याबाबतचा प्रस्ताव सभागृहामध्ये आणलातर बरे होईल. नागरीकांची ओरड असते कराच्या रुपाने पैसे वाढवितो. तरी कायदयामध्ये काही दुरुस्ती करायची असेलतर किंवा स्कॉडची मदत लागत असेलतर ती आपण मागावी ती आपल्याला मिळेल.

मा.ज्ञानेश्वर भालेराव :- मा.महापौर साहेब, जकातीवर वचक बसलेला आहे. १५० कोटी जकात कमी येणे अपेक्षीत होते तशाप्रकारचे चित्र झाले होते परंतु मुंढे साहेबांनी ज्याप्रमाणे काम केले त्यामुळे प्रत्यक्ष २५ ते ३० कोटी कमी पडले आहेत, त्यांचे काम चांगले आहे. ते घरातून बाहेर पडले की कुठल्या नाक्यावर येणार आहेत, कुठे थांबणार आहेत येथपर्यंतची माहिती असते त्यामुळे त्यांना सुध्दा संरक्षण दिले पाहिजे. घरातून बाहेर पडल्यानंतर घरी जाईपर्यंत त्यांना संरक्षण द्यायला पाहिजे. त्यामुळे नक्कीच ८५० कोटी पर्यंत उत्पन्न जाईल. चांगले काम करणा-या अधिका-यांना आपण ताकद दिली पाहिजे तरच उत्पन्न वाढेल. दारुच्या आणि सोन्याच्या बाबतीत सोनारमालक आणि लीकर मालकांची बैठक घेतली पाहिजे. त्यांना समज द्यायला पाहिजे, जप्ती करु,निर्बंध आणू असे सांगीतले पाहिजे. सर्वसामान्य नागरीकाकडून वसुली करतो तशी या लोकांकडून का करत नाहीत. जकात नाक्यावर सीसी कॅमेरे बसविणार होतो ते का बसले नाहीत. स्थायी समितीने त्यास मान्यता दिलेली आहे त्यावर का कारवाई झालेली नाही. त्यामुळे जकात चुकवून जाणारे वाहन आपल्याला पाहायला मिळतील. एवढया चांगल्या विषयावर लवकरात लवकर कार्यवाही करावी.

मा.उल्हास शेट्टी :- मा.महापौर साहेब, जकात वसुल करत असताना गाडयांचे ड्रायव्हर अनपढ असतात जकात भरताना त्यांना वेगळयाप्रकारची वागणूक मिळत असते. त्यादिवशी सॉफ्टवेअर कंपनीचे स्पेअर माझ्या कार्यकर्त्यानी आणले होते.

त्याला ३ लाख ५० हजाराचा माल आहे असे अननेसेसरी सांगीतले जात होते. ज्याची जकात ७ हजार होतहोती त्यासाठी त्याला ३६ हजाराची जकात भरण्यासाठी जबरदस्ती करण्यात आली. फोन केला तो सुध्दा कोणी घेत नव्हते. शेवटी तुमचा फोन गेल्यानंतर ७ हजार जकात घेतली आणि त्या अधिका-यांनी ५०० रुपये सुध्दा घेतले. नगरसेवकांचे फोन घ्यायला पाहिजेत. योग्य जकात लावावी म्हणून विनंती करणारांना उडवाउडवीची उत्तरे मिळत असतीलतर ते बरोबर नाही, चुकिचे आहे. जे योग्य असेल ते करायला पाहिजे. असे परत होता कामा नये. पिंपरी चिंचवड शहरामध्ये जे छोटेछोटे व्यावसायीक आहेत ते मटेरिअल आणत असतात त्यांना चोर म्हणून संबोधले जाणे चुकिचे आहे.

मा.आर.एस.कुमार :- मा.महापौर साहेब, मुंढे साहेबांचे अभिनंदन करतो. गेल्यावर्षी आम्हांला सुध्दा वाटले नव्हते ७५० कोटीची वसुली होणार परंतु ७५० कोटीच्या जवळपास वसुली केली त्याबद्यल अभिनंदन करतो. ३० कोटी दारुविक्रेत्यांची रक्कम आहे. ऑडीट डिपार्टमेंट काय करते त्यांनी काय ऑडीट केले आहे. ७० टक्के लोकांनी जकात चुकविलेली आहे. जकातनाक्यावर काय काय चालते हे माहिती आहे. एखादी हायकॉस्ट मशीनरी आणल्यानंतर ५० लाखाचे बील असेलतर ते २० लाख करतात आणि बाकी ५०-५० टक्के शेअरींग करतात अशा अनेक गोष्टी तेथे चालतात. जूने एजंट ट्रकच्या ट्रक पळवतात व क्लास-४ च्या लोकांना ५०० रुपये दिले की संपले. ५०० रुपयामध्ये ५० हजाराची जकात चुकवतात. या विभागाने चांगले काम केलेतर असे होणार नाही. ऑडीट डिपार्टमेंटच्या लोकांनी चेकिंग केले होते का. व्यवस्थीत हॅण्डल केलेतर ते १०० ते १२५ कोटी जकात वाढवू शकतात. दारु आणि ज्वेलरीची माहिती दिलेली आहे,आम्हांला धक्का बसलेला आहे.एम्प्लॉईजवर चार्जेस ठेवले पाहिजेत.

मा.महापौर :- मुंढे साहेब आपले अभिनंदन झालेले आहे एवढया मोठया रक्कमेची वसूली आहे. त्यामध्ये कायदयाच्या अनुषंगाने त्याबद्यलचा प्रस्ताव जीबीमध्ये आणावा त्याप्रमाणे आम्ही मान्यता देवू. भालेराव यांनी आपल्या संरक्षणाचा मुद्या सांगीतला तसे काही असेलतर तसे सांगावे. आपल्याला पोलीस खात्याची मदत लागत असेलतर किंवा एक्स्ट्रॉ मॅनपॉवर पाहिजे असेलतर ती घ्यावी. सीसी टिव्ही घ्यावे,स्कॉड वाढवायचा असेलतर तो वाढवावा. उल्हास शेट्टी यांनी सांगीतल्याप्रमाणे ड्रायव्हर अनपढ असतात, एजंटकडे फॉर्म दिला जातो त्यांच्याकडून चुकिचा फॉर्म भरला जातो आणि स्कॉडच्या गाडीला बोलावले जाते व ती गाडी पकडली जाते. तूम्ही तुमच्या टिमला विश्वासात घेवून हा प्रॉब्लेम किंवा उणिवा आहेत या पाहायला पाहिजेत. ते बघण्यासाठी दोन-चार कर्मचारी जास्त लागलेतरी ते नाक्यावर ठेवावेत. सामान्य माणसाना काही समजत नाही, वजन चेक केले पाहिजे, कोणते मटेरिअल आहे ते बघितले पाहिजे. तुम्ही सर्व जबाबदारी तेथील नाक्यावरच्या कर्मचा-यांवर

सोपविली पाहिजे.  कायदया मधली दुरुस्ती, नाक्यावरील दुरुस्ती, तुम्हांला लागणारा स्कॉड या बद्यलची माहिती आपण द्यावी.

मा.अशोक मुंढे :-  मा.महापौर साहेब, याच्यामध्ये कायदयाचा मुद्या आहे. एखादी गाडी पकडल्यानंतर दंडाची रक्कम मोठी होत असेलतर संबंधित कोर्टामध्ये जावून जी जकात असेल ती भरतो म्हणून ब-याचशा केसेस हारलो आहोत. आता सुचना केल्याप्रमाणे कायद्यामधील नवीन प्रपोजल जकातीच्या अनुषंगाने मी सादर करेल. त्यासाठी आपल्या सभागृहाची मदत लागेल. संरक्षणाचा मुद्या उपस्थित केला आहे सध्या तशी काही आवश्यकता वाटत नाही ज्यावेळेला तशी गरज पडेल त्यावेळेला मी सभागृहाला सांगेल तेव्हा आपण मदत द्याल अशी अपेक्षा आहे. काही ठिकाणी डिक्लेरेशन असते काही इन्टेन्शन नसताना फॅार्म भरण्यामध्ये चुका होतात आणि गाडी पकडली जाते. मोठमोठया नाक्यावर, मोशी,निगडी,वाकड,फुगेवाडी याठिकाणी एक इन्स्पेक्टर असतो तो पुर्ण गाडी तपासू शकत नाही ही अडचण आहे त्यामुळे मला थोडासा स्टाफ वाढवून दिलातर प्रत्येक गाडी १०० टक्के तपासून घेतली जाईल. स्टाफच्या बाबतीत ब-याचशा वेळा चांगल्या कर्मचा-याची बदली ताबडतोब होवून जाते त्यामुळे काम करण्यास ञास होतो. जास्तीत जास्त चांगले
लोक असतीलतर काम करता येईल. काही चांगल्या कर्मचा-यांची जकात विभागाला आवश्यकता आहे त्यामुळे उत्पन्नामध्ये वाढ करता येईल.

मा.आझमभाई पानसरे :- मा.महापौर साहेब, मागच्यावर्षी आपल्या जकातीचे उत्पन्न किती होते २००८-०९ व २००९-१०  ला किती उत्पन्न झाले हे सांगावे. इन्डस्ट्री चांगली चाललीतर आपोआप उत्पन्न वाढले जाते.  दोन वर्षाची माहिती सांगीतलीतर बरे होईल.

मा.आयुक्त :- मा.महापौर साहेब, आझमभाई पानसरे यांनी जी माहिती मागीतली तो आकडा आता नाही परंतू ६१८ मागच्या वर्षाची आणि या वर्षाची ७१० कोटी आहे. २००८-०९ पासून मंदीचा काळ सुरु झाला त्यामुळे जकात खुप खाली गेलेली आहे. जुलै,ऑगष्ट पासून वाढ दिसते आहे. पहिले तीन महिने शॉर्ट होते ते शेवटच्या चार महिन्यामध्ये यश मिळालेले आहे.

मा.महापौर :- मुंढे साहेबांनी जो खुलासा केला त्या अनुषंगाने कायदयामधील दुरुस्तीचा विषय सभागृहासमोर आणावा त्यास मान्यता देण्यात येईल. त्यांच्या मागणीप्रमाणे त्वरीत त्यांना स्टाफ देण्यात यावा. कर्मचा-यांच्या बदली संदर्भात त्यांनी सांगीतले आहे त्यांची मागणी अशी आहे की चांगल्या माणसांची बदली करुन घेतली जाते त्यामध्ये सर्व सन्मा.सदस्यांनी सहकार्य केले पाहिजे.

मा.रामअधार धारिया :- मा.महापौर साहेब, जकातीचा विषय गंभीर आहे. सभागृहामध्ये अनेकवेळा चर्चा झालेली आहे त्याच्यावर तोडगा निघालेला नाही.  मुंढे साहेबांनी एवढीच माहिती दयावी की अंदाजे वर्षभरामध्ये किती गळती आहे. आपले

उत्पन्न ८०० कोटीचे आहे. गळती किती टक्क्यावर होती हा अंदाज आपण काढू शकता का. गुंडगीरी करणारे लोक अधिका-यांना दम देतात. नाशिक महापालिकेच्या जकातीच्या टेंडरची जाहिरात आलेली आहे तसे आपण टेंडर काढलेतर काय हरकत आहे. त्यामुळे वसुलीचा त्रास होणार नाही आणि पैसे ॲडव्हान्समध्ये येतील व बँक गॅरंटी राहिल. नाशिक महापालिकेनी टेंडर काढलेले आहे त्याप्रमाणे आपल्याला करण्यास हरकत नाही. आपली गळती किती टक्के आहे हे सांगावे. दुसरा मुद्या असा आहे की, वर्षभरामध्ये किती जकातचोराला पकडले आहे त्यावर आपल्या कर्मचा-याना पगार सोडून किती बक्षीस दिलेले आहे त्याचा सुध्दा खुलासा करावा. चोर कोण आहेत हे माहित आहे. त्याला पकडा. एक वर्षभरामध्ये किती पैसे गेले याचा खुलासा करावा. पर्याय काढावा असे आपण म्हणतो मग पर्याय हा सभागृहामधूनच निघेल. नाहीतर एखादा सल्लागार वापस बोलवा. मी सूचना केलेली आहे आपल्याला चांगली वाटलीतर त्याच्यावर अंमलबजावणी करावी नाहीतर “ ना रहेगा बाज, ना रहेगी बासरी ”.

मा.महापौर :- आपण जी सूचना केली ती चांगली आहे.

मा.रामअधार धारिया :- मा.महापौर साहेब, उल्हास शेट्टी यांनी सांगीतले ३६ हजाराचे बील होते आणि ३ लाखाचा माल आहे असे सांगीतले. त्या अधिका-याला ५०० रुपये दिलेतर हे प्रकरण मिटले. माझी सूचना चांगली आहे, नाशिक महापालिकेतून माहिती मागवावी.

मा.विनायक रणसुभे :- मा.महापौर साहेब, तळवडे नाक्यावर स्वत:चा जीव धोक्यात घातला त्या दिपक गायकवाड या कर्मचा-यास दोन वेतनवाढी द्याव्यात असे सांगीतले होते. चार माणसाशी तो एक माणूस झटला आहे. हे सांगून सुध्दा प्रशासनास समजत नाही त्यांना आतापर्यंत दोन वेतनवाढी का दिलेल्या नाहीत.

मा.महापौर :- सर्व सदस्यांच्या सूचना लक्षात घ्याव्यात. प्रश्नोत्तराचा तास संपलेला आहे.

मा.उल्हास शेट्टी :- मा.महापौर साहेब, आपले सहकारी मित्र मारुती भापकर हे पाण्याच्या संदर्भात उपोषणाला बसलेले आहेत. आपण बरेचसे चांगले विषय मार्गी लावलेले आहेत. मारुती भापकर आपले सहकारी मित्र गेल्या वीस दिवसापासून उपोषणाला बसलेले आहेत. गेली तीन दिवस ते अमरण उपोषण करत आहेत आपण पाण्याचा प्रश्न व्यवस्थीत मार्गी लावला आहे, हा उपोषणाचा विषय सोडविला पाहिजे. कमीत कमी आपले सहकारी या नात्याने आपण तो मार्गी लावावा त्यांच्या वेगवेगळया मागण्या आपण सर्वच पुर्ण करु शकत नाहीत. तरी निर्णय घ्यावा सर्वांनी विचार करावा.

मा.तानाजी खाडे :- मा.महापौर साहेब, विषय क्रमांक १ वर मी पुढीलप्रमाणे ठराव मांडतो.

ठराव क्रमांक :- ८४७ विषय क्रमांक :- १
दिनांक :- २१.४.२०१० विभाग :- मा.आयुक्त

संदर्भ- १) मा.महापालिका आयुक्त यांचे जा.क्र.प्रशा/१अ/कावि/७६३/०९ दि.८/१२/०९
२) मा.विधी समिती सभा दिनांक १/१/२०१० ठराव क्र.२३३
३) मा.स्थायी समितीकडील ठ.क्र.१०२१२ दिनांक १६/१/२०१०
४) मा.महापालिका सभा ठराव क्र.८२९ दि.२०.३.२०१० अन्वये

स्थापत्य विभागाकडील "असिस्टंट ट्रान्सपोर्ट प्लॅनर" पदाची आवश्यकता विचारात घेता, महापालिका आस्थापनेवरील सदर पदाची - "वेतनश्रेणी : र.रु.१५६०० - ३९१०० ग्रेड वेतन ५४०० भरतीप्रमाण : १००% सरळसेवेने शैक्षणिक अर्हता : १)स्थापत्य अभियांत्रिकी शाखेची पदवी B.E. [civil] २)महापालिकेतील अभियांत्रिकी पदाचा किमान ५ वर्षाचा अनुभव ३) ट्रान्सपोर्टेशन इंजिनिअरींग मधील पदवीव्युत्तर पदवी असणे आवश्यक ४) ट्रान्सपोर्टेशन इंजिनिअरिंग मधील कामाचा अनुभव असणे आवश्यक", याप्रमाणे वेतनश्रेणी व शैक्षणिक अर्हता असणे आवश्यक असल्याने त्याप्रमाणे बदल करणेस मान्यता देणेत येत आहे.
मा.उत्तम हिरवे :- मा.महापौर साहेब,ठरावास अनुमोदन देतो.

मा.शंकर जगताप :- मा.महापौर साहेब, मी पुढीलप्रमाणे उपसूचना मांडतो-
महापालिकेचे वाढीव कार्यक्षेत्र,रुग्णांची वाढती संख्या तसेच कामकाजाची आवश्यकता विचारात घेता महापालिका आस्थापनेवर "चिफ फार्मासिस्ट" या अभिनामाचे एक नवीन पद र.रु.९३००-३४८०० - ग्रेड पे ५४००/- या वेतनश्रेणीमध्ये निर्माण करुन शासन मान्यता घेण्यास व सदर पद १२वी सायन्स उत्तीर्ण असणाऱ्या व फार्मासिस्ट पदावर नेमणूक असलेल्या संवर्गातील सेवाज्येष्ठ व फार्मासिस्ट पदाचा २० ते २५ वर्षांचा अनुभव असणार कर्मचारी श्री.मंगेश राघोबा जगताप, फार्मासिस्ट या कर्मचाऱ्यास पदोन्नती देऊन भरण्यास मान्यता देणेत यावी.

श्री.भाऊसाहेब व्यंकट खैरे हे प्रकल्पग्रस्त असून ते सध्या पिंपरी चिंचवड महानगरपालिका, पुणे येथे क्रिडा विभागांतर्गत सन २००४ पासून मानधनावरती क्रिडा शिक्षक म्हणून कार्यरत आहेत. त्यांचा प्रकल्पग्रस्तांच्या संवर्गामधून आपल्या आस्थापनेमध्ये सामावून घेण्याबाबतचा प्रस्ताव (प्रस्ताव क्र. क्रिडा/२अ/कावि/३५५/२००७ दि.२३.०३.२००७) पालिकेतील प्रशासन विभागाकडे दि.२८.०३.२००७ रोजी दाखल करण्यात आलेला आहे. तरी सदरील प्रस्ताव पास करुन मान्यतेकरिता शासनाकडे त्वरित पाठवावा.

पिं.चिं.मनपामध्ये उपअभियंता श्री.जाधव शरद दादाभाऊ यांचे पदोन्नतीने अनुसुचित जाती या प्रवर्गातील उपअभियंता पदाची जागा रिक्त होत आहे. सदर जागेवर अनुसुचित जाती प्रवर्गातील पदवीधारक सेवाजेष्ठता यादीमधील प्रथम क्रमांकाचे श्री.राजेंद्र कुंडलिक जावळे यांची पदोन्नतीने नियुक्ती करणेस मान्यता देणेत यावी.

पिंपरी चिंचवड मनपाच्या मा.महानगरपालिका सर्वसाधारण सभेने १९९० साली "असि.ट्रान्स्पोर्टेशन प्लॅनर" पदास मंजुरी दिलेली आहे. तथापि त्यापुढे त्याची कालबद्ध पदोन्नतीचा उल्लेख नाही. त्यामुळे या पदावरील अधिकाऱ्यास इतरांप्रमाणे पुढील पदोन्नतीच्या संधी उपलब्ध झाल्या पाहीजेत. त्यासाठी सोबतच्या प्रपत्र अ प्रमाणे भविष्यामध्ये शैक्षणिक पात्रता,अनुभव व भरती प्रमाण असावे. महानगरपालिका किंवा अर्बन एरिया विकास प्राधिकरण कार्यक्षेत्रातील अनुभव सक्तीचा करावा कारण भविष्यात शहर नियोजनात टाऊन प्लॅनिंग व ट्रान्स्पोर्टेशन प्लॅनींग यांचा विचार करुन एकत्रित नियोजन केल्यास या शहराचे सुनियोजीत व सुयोग्य शहर होईल. तरी पिंपरी चिंचवड शहराचे वाढते शहरीकरण व त्याअनुषंगाने वाढणारी वाहतुकीची कोंडी, वाहन अपघाताचे प्रमाण, पार्कींग व्यवस्थेची गरज शहराचे पर्यायाने वाहतुकीचे भविष्यात सुयोग्य नियोजन करणे व त्यावरील उपायांची प्रभावी अंमलबजावणी करणेसाठी महानगरपालिकेत "असि.ट्रान्स्पोर्टेशन प्लॅनर" पद भरणेत यावे व या उपसुचनेतील प्रपत्र अ प्रमाणे पदोन्नतीच्या संधी भविष्यात देण्यात यावी. शहरांतर्गत सार्वजनिक वाहतुक व्यवस्था सुधारणेसाठी मेट्रो, बीआरटीएस इ. प्रकल्पांचे आधुनिक तंत्रज्ञान व लोकांची गरज लक्षात घेवुन त्याचे योग्य पद्धतीने नियोजन करणे व अंमलबजावणी करणे यासाठी शहर अभियंता यांचे नियंत्रणाखाली ट्रान्स्पोर्टेशन अभियांत्रिकी विभाग सुरु करावा आणि जबाबदारी सोपविणेत यावी.

मा.शांताराम भालेकर :- मा.महापौर साहेब, उपसूचनेस अनुमोदन देतो.

मा.महापौर :- मागच्यावेळेला याच्यावर चर्चा झाली होती. प्रशासनाने. कोणत्या कोणत्या पदाची आवश्यकता आहे याची माहिती द्यावी.

मा.विनायक रणसुभे :- मा.महापौर साहेब, आपण विचारले होते की या शहराच्या प्रशासकीय कामकाजानुसार किती कार्यकारी अभियंत्यांची गरज प्रशासनाला आहे आणि आता किती कार्यकारी अभियंता काम करतात याचा खुलासा द्यावा.

मा.सुधाकर देशमुख (सहा.आयुक्त ) :- मा.महापौर साहेब,आपल्याकडे कार्यकारी अभियंत्यांची रचना त्या त्या विभागप्रमुखा मार्फत ठरविली होती. स्थापत्य विभागामध्ये १६ कार्यकारी अभियंतांची पदे मंजूर आहेत व विदयूत विभागात ८ कार्यकारी अभियंतांची पदे मंजूर आहेत १८ कोटी बजेटसाठी एक कार्यकारी अभियंता अशाप्रकारचा निष्कर्ष आहे. त्याप्रमाणे २४ पाहिजेत शासनाला चार पदांचा प्रस्ताव सादर केलेला आहे.

मा.विनायक रणसुभे :- मा.महापौर साहेब, प्रशासन अधिकारी दिशाभूल करतात. महापालिका सभा ठराव क्रमांक ६१२ अन्वये सभागृहामध्ये वाढीव चार पदनिर्मितीस मागील वर्षी मान्यता दिलेली आहे व वस्तुस्थितीचा विचार केल्यास अजून ५ कार्यकारी अभियंत्यांच्या पदास मान्यता देणेत येत आहे अशाप्रकारचा ठराव केलेला आहे. शहर अभियंता यांनी दिलेल्या माहितीनुसार १६ कार्यकारी अभियंता काम करतात पण २४ ची गरज आहे ८ रिक्त आहेत प्रशासन अधिका-यांनी ४ पदाला मान्यतेसाठी पाठविलेले आहे. शहराची गरज शहर अभियंता यांनी पाठविलेला रिपोर्ट आणि प्रशासन अधिकारी यांनी सांगीतलेली माहिती दिशाभूल करणारी वाटते. ४ पदाच्या मान्यतेसाठीचा प्रस्ताव शासनाकडे पाठवितात म्हणजे याठिकाणी महापालिकेनी केलेल्या ठरावाला वाटाण्याच्या अक्षदा दाखविण्याचे काम केले जाते. या महापालिकेमध्ये कार्यकारी अभियंत्यांकडे दोन-दोन चार्ज दिलेले आहेत. निकम साहेब, बनकर साहेब,शिर्के साहेब,काची साहेब, लडकत साहेब यांच्याकडे दोन-दोन चार्ज दिलेले आहेत. ख-या अर्थाने पदोन्नतीने गेलेले डेप्युटी लेव्हलचे लोक कार्यकारी अभियंत्यांच्या लेव्हलवरचा पगार घेतात. उमेदमान्यतेवर सेप्रेट चार्ज आपण का देत नाहीत. २५ कार्यकारी अभियंत्यांची आवश्यकता आहे याचा विचार करता अशाप्रकारचा महापालिका सभेने ठराव केलेला असताना सुध्दा कारवाई करत नाहीत याचा खुलासा करावा.

मा.श्रीरंग बारणे :- मा.महापौर साहेब, या विषयाला उपसूचना दिली आहे त्याला विरोध आहे. अशा कोणत्याही प्रकारच्या उपसूचना आपल्या कारकिर्दीमध्ये घेवू नयेत की जेणेकरुन चुकिच्या माणसाला पदोन्नती मिळेल. मुळामध्ये या महापालिका क्षेत्रामध्ये कारभारी जास्त झालेले आहेत. ज्याला कामाची माहिती नाही अशा लोकांना चार्ज दिला जातो. त्यासाठी या सभागृहामध्ये विषय मांडल्यावर उपसूचना मांडण्यास चढाओढ लागते. विनायक रणसुभेना सांगतो आपण कुठल्याही अधिका-याविषयी भांडू नये. मुळामध्ये कार्यकारी अभियंता किती काम करतात हा प्रशासनाचा भाग आहे आपण त्यासाठी भांडू नये. एकिकडे या सभागृहात सदस्यांचा अवमान होतो म्हणून आपण भांडतो आणि दुसरीकडे त्यांच्या प्रमोशनसाठी भांडतो ही चुक दुरुस्त केली पाहिजे. आपण सदस्य म्हणून या कारभारावर नियंत्रण ठेवले पाहिजे.कोणासाठी भांडायचे हे ठरविले पाहिजे. अशाप्रकारच्या उपसूचना घेवू नयेत. उपसूचना मंजूर झाल्यानंतर शासनदरबारी वजन टाकून हे कर्मचारी त्या मंजूर करुन आणतात आणि तो चार्ज नाईलाजास्तव दयावा लागतो. या महापालिकेची आर्थिक स्थिती कमजोर करण्यास आपणसुध्दा जबाबदार आहोत. माझा या उपसूचनेला विरोध आहे.

मा.भाऊसाहेब भोईर :- मा.महापौर साहेब, मागील वेळेस या विषयावर सखोल चर्चा झालेली आहे. आपण आदेश सुध्दा दिलेला आहे की, आपण आपल्या पक्षाच्या

माध्यमातून धोरण निश्चित केले पाहिजे. प्रशासनाने हे योग्य आहे का नाही हा खुलासा करावा. एकतर प्रशासनाच्या चुकामुळे लाखो करोडो रुपयाचा भूर्दंड सोसावा लागतो आणि पुन्हा अशी प्रथा पडेल कि, ज्याचे वजन आहे अशा नगरसेवकांकडे अधिका-यांची गर्दी होईल. आयुक्त साहेब आपण सखोल चौकशी करावी, कोणी पीएगिरी तर करत नाही ना याचे संशोधन करणे आवश्यक आहे. अशा पध्दतीचा ठराव करणे गरजेचे नाही अशी आपणच चर्चा करतो. अटि शिथिल करुन आपण एखादयाला देत असालतर हे रान सर्वांना मोकळे होईल. आमचे सुध्दा अनेक मित्र अधिकारी आहेत. अधिका-यांनी अधिका-यांचे काम करायचे आणि आम्ही आमचे काम करायचे याला सुध्दा अचारसंहिता पाहिजे.

मा.महापौर :- आता आपल्याकडे शासनाकडून मान्य झालेली किती पदे आहेत याची माहिती द्यावी. टेंडर सिस्टीम असेल किंवा नोकरभरतीचे नॉर्म्स असतील, पीडब्ल्यूडीच्या नॉर्म्सप्रमाणे सिटि इंजिनिअरच्या म्हणण्याप्रमाणे एवढे पद लागत असतीलतर ते बघावे. एका-एका अधिका-यांना दोन-दोन चार्ज दिलेले आहेत.

मा.सुधाकर देशमुख (सहा.आयुक्त ) :- मा.महापौर साहेब, पुर्वीचा जो ठराव झालेला आहे तो शहर अभियंता किंवा विभागाकडून मागणी न करता सदस्यप्रस्ताव मंजूर झालेला आहे. सदस्य प्रस्तावाच्या बाबतीत अंमलबजावणीची पध्दत अशी आहे की त्याप्रमाणेचा प्रस्ताव प्रशासन विभागाकडून संबंधित विभागाकडे जातो त्यांचे मत घेतले जाते आणि तसा प्रस्ताव सादर केला जातो. त्याप्रमाणे हा ठराव शहर अभियंता यांचे मत घेतल्यानंतर एकत्र बैठक झाली होती. सध्या ४ पदे पुरेशी आहेत JNNURM अंतर्गत आता काम वाढलेले आहे. भविष्यामध्ये अस्थापनेवर बोजा पडेल म्हणून ४ पदांचा प्रस्ताव शासनाकडे मंजूरीसाठी पाठविलेला होता. आपल्याकडे १६ पदे स्थापत्य आणि ८ पदे विदयूतसाठी मंजूर आहेत. १६ पैकी १५ पदे भरलेली आहेत १ पद रिकामे आहे ते भरण्याचे प्रपोज आहे. विदयूत मध्ये ७ पदे भरलेली आहेत आणि एका उपअभियंत्याकडे पदभार दिलेला आहे. शासनाकडे ४ पदे मान्यतेसाठी पाठविलेली आहेत यासाठीची बैठक मा.आयुक्त आणि मा.सचिव पातळीवर झालेली होती मात्र निर्णय झालेला नाही. कामकाज वाटप म्हणजे अतिरिक्त पदभार नाही. कामकाज वाटप शहर अभियंता यांनी करायचे असते त्याप्रमाणे कुठल्या प्रभागाची जबाबदारी द्यायची हे शहर अभियंता व मा.आयुक्त यांच्या मंजूरीने ठरविण्यात येते .

मा.विनायक रणसुभे :- मा.महापौर साहेब,पदोन्नतीने किती डेप्युटी इंजिनिअरला कार्यकारी अभियंताचा पगार देतो आहोत.

मा.सुधाकर देशमुख (सहा.आयुक्त) :- मा.महापौर साहेब, आपल्याकडे उपअभियंत्यांच्या बाबतीत असे नाही १२ वर्षाचा लाभ ज्यांना मिळालेला होता त्याची संख्या आता सांगता येणार नाही. त्याची खात्री करुन सांगावे लागेल.

मा.विनायक रणसुभे :- मा.महापौर साहेब, १२ वर्षे डेप्युटीला पुर्ण झाले त्यांना कार्यकारी अभियंतांचे स्केल द्यावे लागेल. संबंधीत विभागाने तशी मागणी केली पाहिजे असे सांगीतले आहे. शहर अभियंता यांनी ८ ची मागणी केली होती आणि वर पाठवित असताना ४ पदे पाठविलेली आहेत ही सभागृहाची दिशाभूल आहे. १६ लोक काम करतात एकाला प्रभारी चार्ज दिलेला आहे. सभागृहाच्या डोळयामध्ये माती टाकण्याचे काम दिवसाढवळया करु नका. तुम्हांला कार्यकारी अभियंत्यांच्या बाबतीत संपुर्ण माहिती पुढच्या वेळेस द्यावी असे सांगीतलेले आहे. पिठासिन अधिका-यांचे आदेश यांच्यावर बंधनकारक होत नाहीत, प्रशासनावर काय पकड आहे. एक नगरसेवक चुकलातर आम्हांला ताकद दाखविता यांचीतर मिनिटा मिनिटाला चुक आहे. आयुक्त साहेब आपण खुलासा करावा.

मा.आयुक्त :- मा.महापौर साहेब, एका कार्यकारी अभियंतासाठी १८ कोटीचे बजेट पाहिजे ते रुरलला आहे अर्बनला नाही. शासनाकडून ४ ची मान्यता मिळेल त्याच्यानंतर या विषयावर चर्चा करता येणार आहे. एकिकडे आपण म्हणतो की खर्चाला कंट्रोल केले पाहिजे. त्यांच्याकडे चार्ज दिलेला नाहीतर कामकाजाचे वाटप केलेले आहे. अस्थापना खर्चावर सुध्दा अंकुश लावावा लागेल. कार्यकारी अभियंत्यांच्या पोस्ट कमी असल्यामुळे काम होत नाही असे वाटत नाही. पोस्ट वाढवायची गरज नाही असे वाटते. ४ पोस्ट शासनाकडून मंजूर झाल्यातर त्याच्यानंतर ४ चे करता येईल. सर्व विचार करुन या ४ ला सुध्दा मंजूरी मिळत नाही.

मा.महापौर :- आयुक्तांनी केलेल्या खुलाशाप्रमाणे आपण ८ ची मागणी केली होती व ४ नॉर्म्स प्रमाणे पाठविलेले आहेत. मी सुध्दा देशमुख साहेबांबरोबर गेलो होतो त्यालाच ते मान्यता देत नाहीत. आपण १५ सुध्दा पाठवू शकतो. आहे याच अभियंत्याना जास्त काम द्यावे,अस्थापना खर्च वाढतो आहे. आपल्याला काय इन्ट्रेस्ट आहे हे समजत नाही. पहिल्यांदा ४ पदाची मान्यता यायला पाहिजे. सभागृहाचे म्हणणे असेलतर शासनाला पत्र लिहून पाठवावे.

मा.विनायक रणसुभे :- मा.महापौर साहेब, १२ वर्षानंतर आपण स्केल देतो.

मा.आयुक्त :- मा.महापौर साहेब, आपण फक्त वरच्या पोस्टचे स्केल देतो.

मा.विनायक रणसुभे :- मा.महापौर साहेब, २४ कार्यकारी अभियंता दिलेतर सर्वसामान्यांशी निगडीत प्रश्न असतात ते सोडवू शकतात. सर्वच चार्ज एकाला दिलेतर आमच्यासारख्या नगरसेवकाला कधी भेटणार. परवाचा प्रकार जो सुरदास गायकवाड यांचा झाला तो यातूनच झालेला आहे. एका अधिका-याकडे एवढे चार्ज दिल्यानंतर आमच्या सारखे नगरसेवक त्यांना कसे भेटणार.

मा.आझमभाई पानसरे :- मा.महापौर साहेब, अधिका-या मधील आणि नगरसेवकामधील दरी वाढत चालली आहे. डायसवर दोघजण बसले आहेत व महापौर म्हणून आपण आहात. कर्मचा-यांकडून आयुक्त म्हणून त्यांची जबाबदारी

आहे असे चालले आहे. तरी मला वाटत नाही पुढची जीबी चांगली चालेल. अशा पध्दतीने चाललेतर आणखी वाद वाढतील. आता कोणालातरी वाचविण्यापेक्षा ज्यांची चुक आहे त्यांना समोर येवू द्यावे. एकदातरी सोक्षमोक्ष लागला पाहिजे. कोणी चुकत असेलतर त्याला समज द्यावी. आतापर्यंत आपण कोणलातरी वाचवित असता हे आता थांबविले पाहिजे. हे आता केले नाहीतर दिवसेंदिवस दरी वाढत जाईल. तरी याला वेळेतच आळा घातला पाहिजे. कोणी चुकत असेलतर समज द्यावी.

मा.महापौर :- एक पोस्ट रिक्त आहे प्रशासनाने विषय ठेवला आहे उपसूचनेचे काय करायचे हे सांगावे.

मा.जगदीश शेट्टी :- मा.महापौर साहेब,उपसूचनेसह विषय मंजूर करावा.

मा.श्रीरंग बारणे :- मा.महापौर साहेब, आमचा उपसूचनेला विरोध आहे.

मा.रामअधार धारिया :- मा.महापौर साहेब, विषय उपसूचनेसह मंजूर करा किंवा करु नका परंतू नगरसेवकांच्या समस्येचे समाधान झाले पाहिजे. लोकांचे काम झालेतरच समाधान होणार आहे. हे अधिका-यांचे भांडण आहे. पोस्ट कोणालाही द्या. एका अधिका-यास चार-चार चार्ज दिलेतर त्या अधिका-यांना फोन केलातर साहेब मी मिटिंगमध्ये आहे असे सांगतात, मी व्हिजीटला गेलो होतो असे सांगतात. महापालिकेचे इलेक्शन जवळ आहे. दिवसेंदिवस ही खरखर आणि सभागृहाचे वातावरण पेटणार आहे कारण पैशाची टंचाई आहे. सगळयांच्या वॉर्डात कामे चालू आहेत. एका कार्यकारी अभियंत्यांकडे एकच चार्ज द्यावा. डेप्युटी इंजिनिअरचे १२ वर्षे झाले त्यांना प्रमोशन द्या. डेप्युटी इंजिनिअरचे १२ वर्षे झाले त्यांना कार्यकारी अभियंत्यांचे स्केल देतो तर मग त्यांना पद देवून काम करुन घ्या. सत्तेचे विक्रेंदीकरण करा, केंद्रीकरण करु नका. आयुक्त साहेब एकदम कडक डिसीजन घ्या. सगळया डेप्युटी इंजिनिअरला एक-एक चार्ज द्या.

मा.सीमा सावळे :- मा.महापौर साहेब,कोणाला बढती द्यायची हा तुमचा विषय आहे,आपण सत्ताधारी आहात. याठिकाणी अर्हता बदल करण्याचा विषय आहे. ज्यांनी विषय आणला त्यांना विचारायचे आहे की खरच आपल्याला असे अधिकारी मिळत नाहीत का. आपण सीआयआरटी सारख्या संस्था आहेत त्याठिकाणाहून असे अधिकारी भरु शकता. या पदासाठी बाहेरुन अधिकारी भरु शकता. संपुर्ण शहराचे यामध्ये नियोजन आहे याचे गांभीर्य असायला पाहिजे. शहराचा महत्वाचा विषय आहे अर्हता बदलतो आहोत, माझा विरोध नोंदवावा.

मा.आर.एस.कुमार :- मा.महापौर साहेब, आझमभाई पानसरे यांनी सांगीतले की नगरसेवक आणि अधिका-यां मधील अंतर वाढत चालले आहे. पुर्वी आम्ही काम सांगीतलेतर अधिकारी ताबडतोब करायचे व आता अधिका-यांना शंभर फोन करावे लागतात. वॉर्डातील काम झाले नाहीतर लोक आमच्याकडे बोंब मारतात व आम्ही

अधिका-यांना सांगतो. २००६ ते २००९ मध्ये स्थापत्य कामे झाली व वाढीव बीलामुळे महापालिकेची वाट लागली. आज तुमच्याकडे काम करण्यासाठी पैसे नाहीत.
आझमभाई पानसरे यांनी सांगीतल्याप्रमाणे कुठेतरी एका रुम मध्ये बसावे
आणि ही वाढत चाललेली दरी कमी करावी. उपसूचनेमुळे महापालिकेची वाट लागली आहे त्यामुळे ३०० कोटी वाढीव दिले आहेत या उपसूचना बंद करायला पाहिजेत. प्रिन्सिपली उपसूचना बंद कराव्यात त्यामुळे महापालिकेची वाट लागलेली आहे. पार्टि मिटिंगमध्ये उपसूचनांवर चर्चा करत नाहीत याठिकाणी का घेतो. आपण प्रत्येक वेळेस याला प्रमोशन द्या, त्याला प्रमोशन द्या असे का करतो. अधिकारी वाढत चाललेले आहेत. पुर्वी एक सिटि इंजिनिअर आणि एक्झिक्यूटिव्ह होते. आता किती वाढलेले आहेत. अधिका-यांना प्रमोशन द्यायचे आपण कोण ठरविणार, हे ठरवायचे काम प्रशासनाचे आहे, आपण फक्त हो किवा नाही असे म्हणले पाहिजे. यापुढे अजीबात उपसूचना घेवू नका. एक्झिक्यूटिव्ह इंजिनिअरचे काम काय राहिले, पुर्वी टेंडर फॅार्म करत होतो आता कन्सलटन्सी सर्व करते. ॲडमिनिस्ट्रेशन बद्यल, स्टाफ पॅटर्न बद्यल स्टडी करावा. उदया जकात बंद झालीतर आपण पगार सुध्दा देवू शकणार नाहीत. पोस्ट वाढवून द्यायचे बंद करावे. क्लास फोरचा स्टाफ वाढवा म्हणजे आमचे आरोग्य व्यवस्थीत राहिल. ॲडीशनल सिटि इंजिनिअर, सुप्रिटेंडंट इंजिनिअर हे कशाला पाहिजे. त्यांना काही विचारायला गेलोतर आयुक्तांनी सांगीतले असे सांगतात मग या पोस्ट कशाला पाहिजेत. तरी आयुक्त साहेब आपण स्टाफ पॅटर्नबद्यल स्टडी करावा.

मा.राजेश पिल्ले :- मा.महापौर साहेब, आयुक्त साहेबांनी खुलासा दिलेला आहे. आता आपल्या शहरामध्ये JNNURM चे किती प्रोजेक्ट चालू आहेत आणि किती कोटीचे आहेत व त्यावर किती कार्यकारी अभियंता काम करतात, कोण-कोण किती किती कोटीचे काम करतो याचा खुलासा करावा.

मा.महापौर :- विषयाचे काय करायचे हे सांगावे.

मा.राजेश पिल्ले :- मा.महापौर साहेब, हा विषय त्याला जोडून आहे.

मा.महापौर :- असे ऐनवेळचे विषय उपस्थित केलेतर लगेच उत्तर नसणार आहे. पुढच्या वेळेस तुमच्या प्रश्नाचे उत्तर दिले जाईल.

मा.राजेश पिल्ले :- मा.महापौर साहेब, अनेक एक्झिक्यूटिव्ह इंजिनिअर आहेत, अनेक कन्सलटन्सी आहेत त्या काम करतात परंतू अनेक टेंडर असे आहेत की ते ओपन करुन सहा महिने फायनल करत नाहीत,काम लांबत चाललेले आहे.

मा.महापौर :- आपण म्हणतो ॲडीशनल काम देतो, दुसरीकडे म्हणतो कामाचा ताण नाही. चार पदे शासनाकडे पाठविलेली आहेत त्यालाच मंजूरी देत नाहीत. या विषयावर निर्णय काय घ्यायचा हे सांगावे.

मा.भाऊसाहेब भोईर :- मा.महापौर साहेब,तुम्ही आदेश दिलेले होते, आचारसंहिता तुम्ही घालून दिलेली होती. उपसूचना घेवू नका म्हणून आपल्या नेत्यानी सांगीतलेले आहे त्यांचा अपमान होईल अशाप्रकारचे विषय या नंतरच्या काळात केलेतर विश्वासाला तडा जाणार आहे.

मा.महापौर :- सन्मा.सभागृहाच्या भावना विचारात घेता अशा किती पदाची आवश्यकता आहे असे मी विचारले होते. निर्णय सर्व सभागृह घेत असते. चार पदे मंजूरी करता पाठवलेली आहेत त्यालाच शासन मंजूरी देत नाही. विदयूत आणि स्थापत्यामध्ये एक-एक जागा खाली आहे. आयुक्तांनी माहिती दिली आहे. डेप्युटीना स्केल दिलेतरी ते पद रिक्त होत नाही. चार पदाला शासनाने मंजूरी दिलेली नाही. आता याठिकाणी विषय आहे त्याचे काय करायचे हे सांगावे.

मा.श्रीरंग बारणे :- मा.महापौर साहेब, विषय आहे तसा मंजूर करण्यास विरोध नाही परंतु उपसूचना मांडली त्या उपसूचनेला विरोध आहे. कोणाला पद द्यायचे कोणाला नाही हे प्रशासन ठरवेल. विधी समिती मार्फत महापालिका सभेसमोर विषय येवू द्यावा. प्रशासनाला आदेश द्यावेत जेवढयांना पदोन्नती देणे बाकी आहे,ज्यांच्यावर अन्याय झालेला आहे त्यांचा विषय पुढच्या जीबी मध्ये येवू द्यावा. चुकिच्या पध्दतीने कारभार चाललेला आहे. सत्तेच्या जोरावर आपण विषय मारुन नेता त्याला आपण जबाबदार आहात. झालेली चुक सुधारण्यासाठी आपण चांगला निर्णय घ्यावा. ज्यांच्यावर अन्याय होतो त्यांचा विषय पुढच्या महापालिका सभेमध्ये ठेवावा असे आदेश द्यावेत आमचा उपसूचनेला विरोध आहे.

मा.आझमभाई पानसरे :- मा.महापौर साहेब, सदस्यांना याठिकाणी उपसूचना मांडण्याचा अधिकार आहे. परंतु सगळयांचे एकमत होणे आवश्यक आहे. आता याठिकाणी शंकर जगताप यांनी उपसूचना मांडली आहे त्याला अनुमोदन दिले आहे व भाऊसाहेब भोईर,श्रीरंग बारणे यांनी उपसूचना घेवू नये असा विषय मांडला आहे, आपले ज्येष्ठ सदस्य विरोध करत आहेत. चर्चा झालेली आहे. ही उपसूचना शेवटची घ्यावी. त्याच्यानंतर पुन्हा उपसूचना घेवू नये. उपसूचना मांडली आहे त्याला अनुमोदन दिले आहे. सगळयांची इच्छा अशी आहे की आपला कारभार चांगला चालावा,कामकाज चांगले व्हावे या मताशी मी सुध्दा सहमत आहे परंतु नेमका हा विषय मांडला आहे त्याला अनुमोदन दिले आहे. त्याऐवजी हा विषय आत्ता तहकूब ठेवावा. पुढील वेळी याबाबत निर्णय घ्यावा.

मा.महापौर :- विषयाची उपसूचना माघारी घ्यावी लागेल नंतर विषय तहकूब करता येईल. विषय उपसूचनेसहीत मंजूर केला तरी प्रशासन त्याची शहानिशा करुन

अंमलबजावणी करेल. दुसरा मार्ग म्हणजे विधी समितीच्या अजेंडयावर या उपसूचनांचे विषय येऊ द्या. अजेंडावर विषय आहे तसा मंजूर करावा. आत्ताच उपसूचनांना मंजूरी द्यायची आहे असे काही नाही. विधी समिती मार्फत अजेंडयावर विषय येऊ द्यावा. उपसूचना माघारी घ्यावी अशी विनंती करतो.

मा.शंकर जगताप :- मा.महापौर साहेब, आजचा जो उपसूचनांचा विषय आहे, त्यावर बऱ्याच मान्यवर सदस्यांनी भाष्य केले आहे. उपसूचना मांडली म्हणजे पदोन्नती मिळली असे नाही. त्याच्यासाठी शासनाकडे जावे लागते. सन्मा.सभागृहाने विनंती केली म्हणून मी उपसूचना मागे घेत आहे.

मा.शांताराम भालेकर :- मा.महापौर साहेब, अनुमोदन देतो.

मा.महापौर :- सभागृहाच्या परवानगीने उपसुचना मागे घेतलेली आहे.

यानंतर सदर ठराव मतास टाकणेत आला असता -

अनुकूल :-६५ प्रतिकूल :-०

अशी मते पडली व सदर ठराव सर्वानुमते मान्य झाल्याचे मा.महापौर यांनी प्रकट केले.

------------------------

मा.तानाजी खाडे :- मा.महापौर साहेब, विषय क्रमांक २ वर मी पुढीलप्रमाणे ठराव मांडतो.

ठराव क्रमांक :- ८४८ विषय क्रमांक :- २
दिनांक :- २१.४.२०१० विभाग :- मा.आयुक्त

संदर्भ- १) मा.महापालिका आयुक्त यांचे जावक क्र.नरवि/कावि/७/२०१० दि.४/२/२०१०
२) मा.विधी समितीकडील ठ.क्र.२५९ दिनांक ५.२.२०१०
३) मा.महापालिका सभा ठ.क्र.८३३ दिनांक २०.३.२०१० अन्वये

टि.डी.आर. बाबतचे दि. ३ फेब्रुवारी २००७ रोजीचे शासननिदेश व त्यानुषंगाने नगर विकास विभागाकडील दि. १६/८/२००७ रोजीचे मार्गदर्शन याचा साकल्याने विचार करता पिंपरी चिंचवड महानगरपालिकेबरोबर केलेल्या लेखी करार असल्यास कराराचे तारखेपासून किंवा महापालिकेची सुधारित मंजूर विकास योजना आराखडयाच्या मंजूरी दिनांकापासून म्हणजेच दि.१८ सप्टेंबर १९९५ पासून जमिन मालकांना कोणताही मोबदला न देता प्रत्यक्षात त्यांच्या ताब्यात असलेल्या जागेवर रस्ते व आरक्षणे इ. विकास कामे केलेली आहेत अशा सर्व संबंधितांना महानगरपालिकेच्या नावे नोंदणीकृत हस्तांतर दस्त लिहून दिल्यास नियमाप्रमाणे होणारा मोबदला एफ.एस.आय./टि.डी.आर.च्या स्वरुपात देणेकामी व त्याप्रमाणे

प्रस्तावासोबत जोडलेल्या प्रपत्र अ व प्रपत्र ब प्रमाणे विकास नियंत्रण नियमावलीमध्ये बदल करणेकामी महाराष्ट्र प्रादेशिक व नगररचना अधिनियम १९६६ चे कलम ३७ अन्वये फेरबदल करणेस मान्यता देणेत येत आहे.

मा.उल्हास शेट्टी :- मा.महापौर साहेब, ठरावास अुनमोदन देतो.

मा.श्रीरंग बारणे :- मा.महापौर साहेब, १९९५ पासून जमिनमालकांना कोणताही मोबदला दिलेला नाही आणि प्रत्यक्ष ताबा घेतलेला आहे अशा मालकांना टिडीआर देण्यापुरता प्रशासनाच्या वतीने विषय ठेवलेला आहे. अशा किती जागा,किती रस्ते आहेत. कोणत्या भागामध्ये अशा किती जागा आहेत, किती रस्ते आहेत,किती टिडीआर द्यावा लागेल. विषय ठेवला म्हणजे विषयाची माहिती गोळा केलेली असेल. कोणत्या भागामध्ये अशाप्रकारचा टिडीआर द्यावा लागेल, काही रस्ते निश्चित केले आहेत का, रस्त्याची लांबी रुंदी पाहिली आहे का. किती मालकांनी टिडीआर किंवा एफएसआय  मिळावा म्हणून मागणी केली आहे याचा खुलासा करावा.

मा.अविनाश पाटिल ( उपसंचालक नगररचना ) :-  मा.महापौर साहेब, १९९५ नंतरच्या रस्त्याची माहिती संकलीत करण्याचे काम चालू आहे परंतु ज्या लोकांच्या जागेवर रस्ता झालेला आहे आणि मोबदला दिलेला नाही अशा ५१ लोकांनी मागणी करुन सुध्दा देता आलेला नाही. (५१ लोकांच्या नावाची यादी वाचन केली).

मा.राजेंद्र काटे :-  मा.महापौर साहेब,  दापोडी-पिंपळेगुरव रोडसाठी जागा घेतलेली आहे. महापालिकेला आम्ही सहकार्य केलेले आहे. त्यावेळेला आम्ही कोर्टामध्ये गेलेलो होतो. प्रशासनाने पत्र दिलेले होते की शासन निर्णय घेईल त्याप्रमाणे दिले जाईल. ते नाव यादीमध्ये घेतलेले नाही.

मा.महापौर :-  तुम्ही तूमचे प्रकरण त्यांच्याकडे द्यावे  ते समाविष्ट करतील.

मा.श्रीरंग बारणे :-  मा.महापौर साहेब, खरेतर ज्या शेतक-यांनी या जागा रस्त्यासाठी, डेव्हलपमेंटसाठी दिल्या आहेत प्रामुख्याने त्या शेतक-यांना त्याचा मोबदला मिळत नाही हा मोबदला व्यावसायीकांना मिळतो. प्रामुख्याने १९९५ नंतरचा टिडीआर,एफएसआय देण्यासंदर्भात भविष्यात टिडीआर माफीया तयार करतो आहोत असे दिसून येते आहे. ज्या शेतक-यांच्या जागा गेलेल्या आहेत,  जमिनी रस्त्यामध्ये गेलेल्या आहेत त्या शेतक-यांना कवडीमोल पैसे मिळालेले आहेत. ती माणसे राहिलेली नाहीत त्यांचा लाभ अनेकांना होतो आपण कागदावर करुन पैसे कमावून देण्याचे साधन करतो. हा विषय पास होणार आहे परंतू अशाप्रकारे महापालिकेला खड्डयात घालण्याचे काम करतो आहोत.  जे रस्ते ताब्यात आहेत त्याचा टिडीआर महापालिका का विकत नाही. महापालिकेच्या ताब्यात रस्ते आहेत, खर्च करतो आहोत या संदर्भात धोरणात्मक निर्णय घ्यायला पाहिजे.  अशापध्दतीने चुकिचा विषय आणतात याचा निषेध करतो.

यानंतर सदर ठराव मतास टाकणेत आला असता-

अनुकूल -६५ प्रतिकूल-०

अशी मते पडली व सदर ठराव सर्वानुमते मान्य झाल्याचे मा.महापौर यांनी प्रकट केले.

----

मा.उल्हास शेट्टी :- मा.महापौर साहेब, विषय क्रमांक ३ वर मी पुढीलप्रमाणे ठराव मांडतो.

विषय क्रमांक :- ३

दिनांक :- २१.४.२०१० विभाग :- मा.आयुक्त

संदर्भ- १) मा.महापालिका आयुक्त यांचे जावक क्र.नरवि/कावि/वि.नि. नि./०८/२०१० दि.०४/०२/२०१०

२) मा.विधी समितीकडील ठ.क्र.२६० दिनांक ५.२.२०१०

३) मा. महापालिका सभा ठ.क्र.८३४ दिनांक २०.३.२०१० अन्वये

मंजूर विकास नियंत्रण नियमावलीमध्ये आरक्षित जागेच्या सभोवताली असलेल्या वापराचे वर्गीकरण विचारात घेऊन विकास हक्क हस्तांतरणासाठी (टि.डी.आर.)अनुज्ञेय करावयाचा चटई क्षेत्र निर्देशांक किती असावा हे प्रस्तावासोबतच्या तक्त्यात नमूद करण्यात आलेले असुन त्यानुसार म.प्रा.व न.रा.अधिनियम १९६६ चे कलम ३७ (१) नुसार मंजुर विकास नियंत्रण नियमावलीमध्ये नियम क्र. N.**2.4.5** मध्ये बदल करणेसाठी/तरतुदी नव्याने समाविष्ट करणेसाठी पुढील प्रमाणे फेरबदल प्रस्तावीत करण्यात आला असुन- “ N.**2.4.5-** The builtup area for the purpose of F.S.I. credit in the DRC shall be equal to the gross of the reserved plot to be surrendered & will proportionately increase or decrease according to the permissible FSI of the Zone where from the TDR has originated and more particularly mentioned in Table No.**31**”, त्यानुसार सदरचे नियम विकास नियंत्रण नियमावलीमध्ये समाविष्ट करण्याच्या फेरबदलास म.प्रा. व न.रा. अधिनियम १९६६ चे कलम ३७ (१) नुसार कार्यवाही करणेस मान्यता देणेत येत आहे.

मा.विनायक रणसुभे :- मा.महापौर साहेब, ठरावास अनुमोदन देतो.

मा.जगदीश शेट्टी :- मा.महापौर साहेब, विषय क्रमांक ३ चा विचार पुढील सभेचे वेळी करणेत यावा अशी सूचना मी मांडतो.

मा.राजेश पिल्ले :- मा.महापौर साहेब, सूचनेस अनुमोदन देतो.

यानंतर सूचनेप्रमाणेचा ठराव मतास टाकणेत आला असता-

ठराव क्रमांक :- ८४९ विषय क्रमांक :- ३
दिनांक :- २१.४.२०१० विभाग :- मा.आयुक्त

संदर्भ- १) मा.महापालिका आयुक्त यांचे जावक क्र.नरवि/कावि/वि.नि. नि./०८/२०१० दि.०४/०२/२०१०
२) मा.विधी समितीकडील ठ.क्र.२६० दिनांक ५.२.२०१०
३) मा. महापालिका सभा ठ.क्र.८३४ दिनांक २०.३.२०१० अन्वये

विषय क्रमांक ३चा विचार पुढील सभेचे वेळी करणेत यावा.

अनुकूल -६५ प्रतिकूल- ०

अशी मते पडली व सदर ठराव सर्वानुमते मान्य झाल्याचे मा.महापौर यांनी प्रकट केले.

------

मा.तानाजी खाडे :- मा.महापौर साहेब, विषय क्रमांक ४ वर मी पुढीलप्रमाणे ठराव मांडतो.

विषय क्रमांक :- ४
दिनांक :-२१.४.२०१० विभाग :- मा.आयुक्त

संदर्भ :-१) मा.महापालिका आयुक्त यांचे जावक क्र.प्रशा/१/कावि/१५/२०१० दि.६.१.२०१०
२) मा.विधी समितीकडील ठ.क्र.२६४ दि.१९.३.२०१०

श्री.साहेबराव गायकवाड, सहाय्यक आयुक्त, पिंपरी चिंचवड महानगरपालिका यांना प्रतिनियुक्तीच्या अटी व शर्तीनुसार दिनांक २५/०९/२००९ पासून एक वर्ष कालावधीकरिता मुदतवाढ देण्यास मान्यता देणेत येत आहे.

मा.उल्हास शेट्टी :- मा.महापौर साहेब, ठरावास अनुमोदन देतो.

मा.रामअधार धारिया :- मा.महापौर साहेब, मी पुढीलप्रमाणे उपसूचना मांडतो-

महाराष्ट्र शासनाकडून प्रतिनियुक्तीवर आलेल्या सर्व सहा.आयुक्त दर्जाच्या व अति.आयुक्त, शहर अभियंता दर्जाच्या अधिकाऱ्यांची ३ वर्ष पूर्ण झालेली आहेत त्यांना ३० मे २०१० पर्यंत मनपा सेवेतुन मुक्त करुन शासनाकडे परत पाठवावे. सभावृत्तांत कायम होण्याची वाट न पाहता कार्यवाही करावी.

मा.विनायक रणसुभे :- मा.महापौर साहेब,उपसूचनेला अनुमोदन देतो.

मा.तानाजी खाडे :- मा.महापौर साहेब, उपसूचना स्विकारली आहे.

यानंतर उपसूचनेप्रमाणेचा दुरुस्त ठराव मतास टाकणेत आला असता-

ठराव क्रमांक :- ८५०  विषय क्रमांक :- ४
दिनांक :-२१.४.२०१०  विभाग :- मा.आयुक्त

संदर्भ :-१) मा.महापालिका आयुक्त यांचे जावक क्र.प्रशा/१/कावि/१५/२०१० दि.६.१.२०१०
२) मा.विधी समितीकडील ठ.क्र.२६४ दि.१९.३.२०१०

श्री.साहेबराव गायकवाड, सहाय्यक आयुक्त, पिंपरी चिंचवड महानगरपालिका यांना प्रतिनियुक्तीच्या अटी व शर्तीनुसार दिनांक २५/०९/२००९ पासून एक वर्ष कालावधीकरिता मुदतवाढ देण्यास मान्यता देणेत येत आहे.

महाराष्ट्र शासनाकडून प्रतिनियुक्तीवर आलेल्या सर्व सहा.आयुक्त दर्जाच्या व अति.आयुक्त, शहर अभियंता दर्जाच्या अधिकाऱ्यांची ३ वर्ष पूर्ण झालेली आहेत त्यांना ३० मे २०१० पर्यंत मनपा सेवेतुन मुक्त करुन शासनाकडे परत पाठवावे. सभावृत्तांत कायम होण्याची वाट न पाहता कार्यवाही करावी.

अनुकूल -६५  प्रतिकूल- ०

अशी मते पडली व सदर ठराव सर्वानुमते मान्य झाल्याचे मा.महापौर यांनी प्रकट केले.

------

मा.तानाजी खाडे :- मा.महापौर साहेब, विषय क्रमांक ५ वर मी पुढीलप्रमाणे ठराव मांडतो.

ठराव क्रमांक :- ८५१  विषय क्रमांक :- ५
दिनांक :-२१.४.२०१०  विभाग :- मा.आयुक्त

संदर्भ :- १) मा.महापालिका आयुक्त यांचे जावक क्र.प्रशासन/१/कावि/६१/२०१० दि.११.१.२०१०
२) मा.विधी समितीकडील ठ.क्र.२६५ दि.१९.३.२०१०

श्री.ए.वाय.कारचे, मुख्याधिकारी गट - अ यांची सहा.आयुक्त, पिंपरी चिंचवड महानगरपालिका या पदावर १ वर्ष कालावधीकरीता प्रतिनियुक्तीने नियुक्ती करणेस मान्यता देणेत येत आहे.

मा.राजेंद्र साळुंके :- मा.महापौर साहेब, ठरावास अनुमोदन देतो.

यानंतर सदर ठराव मतास टाकणेत आला असता-

अनुकूल -६५  प्रतिकूल- ०

अशी मते पडली व सदर ठराव सर्वानुमते मान्य झाल्याचे मा.महापौर यांनी प्रकट केले.

------

मा.तानाजी खाडे :- मा.महापौर साहेब, विषय क्रमांक ६ वर मी पुढीलप्रमाणे ठराव मांडतो.

ठराव क्रमांक :- ८५२ विषय क्रमांक :- ६

दिनांक :-२१.४.२०१० विभाग :- मा.आयुक्त

संदर्भ :-१) मा.महापालिका आयुक्त यांचे जावक क्र.वि/भुगयो/तां/३७३/१० दि.२७.१.२०१०

२) मा.विधी समितीकडील ठ.क्र.२६६ दि.१९.३.२०१०

चिंचवड मैला शुध्दीकरण केंद्र त्रैवार्षिक कालावधीकरीता चालन देखभाल दुरुस्तीस देणेकामी र.रु.२,०९,००,०००/- चे खर्चास प्रशासकीय मान्यता देणेत येत आहे.

मा.उल्हास शेट्टी :- मा.महापौर साहेब, ठरावास अनुमोदन देतो.

मा.राजू मिसाळ :- मा.महापौर साहेब, मी उपसूचना मांडतो-

मा.महापौर :- हा विषय तरतूद वर्गीकरणाचा नाही, तशी उपसूचना देता येणार नाही, प्रशासकीय मान्यतेचा विषय आहे.

यानंतर सदर ठराव मतास टाकणेत आला असता-

अनुकूल - ६५ प्रतिकूल- ०

अशी मते पडली व सदर ठराव सर्वानुमते मान्य झाल्याचे मा.महापौर यांनी प्रकट केले.

------

मा.विनायक रणसुभे :- मा.महापौर साहेब, विषय क्रमांक ७ वर मी पुढीलप्रमाणे ठराव मांडतो.

विषय क्रमांक :- ७

दिनांक :-२१.४.२०१० विभाग :- मा.आयुक्त

संदर्भ :- १) मा.महापालिका आयुक्त यांचे जावक क्र.वि/भुगयो/तां/३७४/१० दि.२७.१.२०१०

२) मा.विधी समितीकडील ठ.क्र.२६७ दि.१९.३.२०१०

कासारवाडी मैलाशुध्दीकरण केंद्र टप्पा - १ त्रैवार्षिक कालावधीकरीता चालन देखभाल दुरुस्तीस देणेकामी र.रु. २,४१,००,०००/- चे खर्चास प्रशासकीय मान्यता देणेत येत आहे.

मा.उल्हास शेट्टी :- मा.महापौर साहेब, ठरावास अनुमोदन देतो.

मा.आर.एस.कुमार :- मा.महापौर साहेब, माझा विरोध नाही परंतू आयुक्त साहेबांनी ४ कोटी दिलेले आहेत, पाणीपुरवठयासाठी पैसे कमी होतात. गेल्यावेळेस पाणीपुरवठयाच्या मेन्टेनन्ससाठी पैसे कमी दिलेले असल्यामुळे शहराला तीन दिवस पाणी कमी मिळाले आहे मोटार रिपेअर झाल्या नाहीत. पाणीपुरवठयाचे पैसे कमी करु नका.

मा.राजू मिसाळ :- मा.महापौर साहेब, मी पुढीलप्रमाणे उपसूचना मांडतो -
सांगवी विभागात जयमालानगर,अभिनवनगर,संगमनगर व इतर भागांत पावसाळी गटार टाकणे, रस्त्याचे डांबरीकरण करुन मजबुतीकरण करणे इ.कामे करणे गरजेचे आहे. सदर कामांसाठी खाली नमूद केल्याप्रमाणे कामांची आवश्यकता आहे.

| अ. क्र. | लेखाशीर्ष | कामाचे नाव | अंदाजपत्रकीय रक्कम(कोटी) | आवश्यक तरतूद |
|---|---|---|---|---|
| १ | पथ-डांबरी रस्ते | सांगवी वॉर्ड क्र.९१, जयमालानगर,गल्ली १ ते ६ मधील रस्त्याचे Ultra Tin White Topping पद्धतीने किंवा डांबरीकरण करणे व इतर स्थापत्यविषयक कामे करणे. | ५.३० | ०.०० |
| २ | पथ-डांबरी रस्ते | सांगवी वॉर्ड क्र.९१ ममतानगर व इतर भागांतील रस्त्याचे Ultra Tin White Topping किंवा डांबरीकरण करणे व इतर स्थापत्यविषयक कामे करणे. | ३.५० | ०.०० |
| ३ | पथ-डांबरी रस्ते | सांगवी वॉर्ड क्र.९१ अभिनवनगर,लक्ष्मीनगर व इतर भागांतील रस्त्याचे Ultra Tin White Topping किंवा डांबरीकरण करणे व इतर स्थापत्यविषयक कामे करणे. | ५.८५ | ०.०० |
| ४ | पथ-डांबरी रस्ते | सांगवी वॉर्ड क्र.९१ प्रियदर्शिनीनगर व इतर भागांतील रस्त्याचे Ultra Tin White Topping किंवा डांबरीकरण करणे व इतर स्थापत्यविषयक कामे करणे. | ३.४० | ०.०० |
| ५ | पथ-डांबरी रस्ते | सांगवी वॉर्ड क्र.९१ संगमनगर व इतर भागांतील रस्त्याचे Ultra Tin White Topping किंवा डांबरीकरण करणे व इतर स्थापत्यविषयक कामे करणे. | ५.९१ | ०.०० |
| ६ | पथ-डांबरी रस्ते | सांगवी स.नं.३ ते १३ मधील डी.पी. रस्ता विकसित करणे. | ७.८५ | ०.०० |

वरील कामांचा समावेश अंदाजपत्रक २०१०-११ मध्ये करण्यात यावा. त्याकरिता अंदाजपत्रकीय रकमेस प्रशासकीय मान्यता देणेत यावी. सदर प्रस्ताव कायम होण्याची वाट न पाहता कार्यवाही करावी तसेच अंदाजपत्रक २०१०-११ मधील भांडवली खर्चाच्या तरतूदींमध्ये खालील तक्त्याप्रमाणे वाढ-घट (वर्गीकरण) करणेत यावी. सदर प्रस्ताव कायम होणेची वाट न पाहता कार्यवाही करावी.

मा.राजेश पिल्ले :- मा.महापौर साहेब, उपसूचनेला अनुमोदन देतो.

मा.महापौर :- वर्गीकरण कुठून करायचे आहे हे दिलेले आहे का.

मा.भाऊसाहेब भोईर :- मा.महापौर साहेब, तुम्ही अशा उपसूचना मंजूर केल्यातर प्रकल्पावर बजेट केलेले आहे त्याची वाट लागेल. पालकमंत्री यांच्या आदेशाचे पालन करावे,उपसूचना घेवू नका. नेत्यांचा अपमान करायचा असेलतर करावा.

मा.प्रशांत शितोळे :- मा.महापौर साहेब, यामुळे अंदाजपत्रकामध्ये कुठल्याहीप्रकारचा फरक पडत नाही. आपण नवीन कामाची निर्मिती करतो आहोत. उपसूचना योग्य आहे ती ग्राहय करायला पाहिजे. बजेटमध्ये एक पैसा सुध्दा वाढ होणार नाही.

मा.भाऊसाहेब भोईर :- मा.महापौर साहेब, सिस्टीमला विरोध करतो, चेअरमनचा आदर करतो. बजेटवर विपरीत परिणाम होणार नाही ना, याचा आयुक्तांनी खुलासा करावा.

मा.श्रीरंग बारणे :- मा.महापौर साहेब, चेअरमननी सगळयांचा विचार केला पाहिजे. फक्त तुमच्या वॉर्डाचा विचार करता. महापालिका सभेने मंजूरी दिल्यानंतर स्थायी समितीमध्ये वर्गीकरण करणार आहेत परत हा विषय महापालिका सभेमध्ये येणार नाही. माझा विरोध नाही परंतु अशाप्रकारे कामे होत असतीलतर आमच्या वॉर्डामध्ये सुध्दा करा परंतु चुकिच्या पध्दतीने होवू नये.

मा.भीमा बोबडे :- मा.महापौर साहेब, मी पाठिमागे सांगीतले होते माझ्या वॉर्डातील रोड दाखविले होते तेव्हा आपण म्हणालात कि तरतूद नाही. भोसरी पासून थरमॅक्स चौकापर्यंत रोड आलेला आहे त्यासाठी तीन वर्षे लागली माझ्या वॉर्डाच्या तेथे काम थांबलेले आहे. त्याठिकाणी लोकांचे ॲक्सीडेंट झालेले आहेत आणि तुम्ही म्हणता पैसे नाहीत. आपण सांगीतले होते की नवीन वर्षामध्ये काम चालू करतो त्याठिकाणी लोक मरतात आणि तो रस्ता करण्यासाठी पैसे नाहीत म्हणतात.

मा.अशोक सोनवणे :- मा.महापौर साहेब, स्थायी समितीचे चेअरमन यांनी आता सांगीतले आहे, त्यांनी सांगीतल्याप्रमाणे आर्थिक बोजा पडणार नाही. त्यांचा उद्देश असा आहे की हेड ओपन करायचे. फक्त हेड ओपन करणार आहेत.

मा.महापौर :- उपसूचनेमध्ये असे म्हणलेले आहे की, वरील कामांचा समावेश अंदाजपत्रक २०१०-११ मध्ये करण्यात यावा. त्याकरिता अंदाजपत्रकीय रकमेस प्रशासकीय मान्यता देणेत यावी. सदर प्रस्ताव कायम होण्याची वाट न पाहता कार्यवाही करावी तसेच अंदाजपत्रक २०१०-११ मधील भांडवली खर्चाच्या तरतूदींमध्ये खालील तक्त्याप्रमाणे वाढ-घट (वर्गीकरण) करणेत यावी. हे कोणाच्या हेडमधुन कमी केलेले नाही त्यामुळे विषय मंजूर करण्यास हरकत नाही.

मा.विनायक रणसुभे :- मा.महापौर साहेब, उपसुचना स्विकारली आहे.

यानंतर उपसूचनेप्रमाणेचा दुरुस्त ठराव मतास टाकणेत आला असता-

ठराव क्रमांक :- ८५३ विषय क्रमांक :- ७
दिनांक :-२१.४.२०१० विभाग :- मा.आयुक्त

संदर्भ :- १) मा.महापालिका आयुक्त यांचे जावक
क्र.वि/भुगयो/तां/३७४/१० दि.२७.१.२०१०
२) मा.विधी समितीकडील ठ.क्र.२६७ दि.१९.३.२०१०

कासारवाडी मैलाशुध्दीकरण केंद्र टप्पा - १ त्रैवार्षिक कालावधीकरीता चालन देखभाल दुरुस्तीस देणेकामी र.रु. २,४१,००,०००/- चे खर्चास प्रशासकीय मान्यता देणेत येत आहे.

सांगवी विभागात जयमालानगर,अभिनवनगर,संगमनगर व इतर भागांत पावसाळी गटार टाकणे, रस्त्याचे डांबरीकरण करुन मजबुतीकरण करणे इ.कामे करणे गरजेचे आहे. सदर कामांसाठी खाली नमूद केल्याप्रमाणे कामांची आवश्यकता आहे.

| अ. क्र. | लेखाशीर्ष | कामाचे नाव | अंदाजपत्रकीय रक्कम(कोटी) | आवश्यक तरतूद |
|---|---|---|---|---|
| १ | पथ-डांबरी रस्ते | सांगवी वॉर्ड क्र.९१, जयमालानगर,गल्ली १ ते ६ मधील रस्त्याचे Ultra Tin White Topping पद्धतीने किंवा डांबरीकरण करणे व इतर स्थापत्यविषयक कामे करणे. | ५.३० | ०.०० |
| २ | पथ-डांबरी रस्ते | सांगवी वॉर्ड क्र.९१ ममतानगर व इतर भागांतील रस्त्याचे Ultra Tin White Topping किंवा डांबरीकरण करणे व इतर स्थापत्यविषयक कामे करणे. | ३.५० | ०.०० |
| ३ | पथ-डांबरी रस्ते | सांगवी वॉर्ड क्र.९१ अभिनवनगर,लक्ष्मीनगर व इतर भागांतील रस्त्याचे Ultra Tin White Topping किंवा डांबरीकरण करणे व इतर स्थापत्यविषयक कामे करणे. | ५.८५ | ०.०० |
| ४ | पथ-डांबरी रस्ते | सांगवी वॉर्ड क्र.९१ प्रियदर्शिनीनगर व इतर भागांतील रस्त्याचे Ultra Tin White Topping किंवा डांबरीकरण करणे व इतर स्थापत्यविषयक कामे करणे. | ३.४० | ०.०० |
| ५ | पथ-डांबरी रस्ते | सांगवी वॉर्ड क्र.९१ संगमनगर व इतर भागांतील रस्त्याचे Ultra Tin White Topping किंवा डांबरीकरण करणे व इतर स्थापत्यविषयक कामे करणे. | ५.९१ | ०.०० |
| ६ | पथ-डांबरी रस्ते | सांगवी स.नं.३ ते १३ मधील डी.पी. रस्ता विकसित करणे. | ७.८५ | ०.०० |

वरील कामांचा समावेश अंदाजपत्रक २०१०-११ मध्ये करण्यात यावा. त्याकरिता अंदाजपत्रकीय रकमेस प्रशासकीय मान्यता देणेत येत आहे. सदर प्रस्ताव कायम होण्याची वाट न पाहता कार्यवाही करावी तसेच अंदाजपत्रक २०१०-११ मधील भांडवली खर्चाच्या तरतूदींमध्ये खालील तक्त्याप्रमाणे वाढ-घट (वर्गीकरण) करणेत यावी. सदर प्रस्ताव कायम होणेची वाट न पाहता कार्यवाही करावी.

अनुकूल-६५ प्रतिकूल-०

अशी मते पडली व सदर ठराव सर्वानुमते मान्य झाल्याचे मा.महापौर यांनी प्रकट केले.

-----

मा.राजेंद्र साळूंके :- मा.महापौर साहेब, विषय क्रमांक ८ वर मी पुढीलप्रमाणे ठराव मांडतो.

ठराव क्रमांक :- ८५४ विषय क्रमांक :- ८

दिनांक :-२१.४.२०१० विभाग :- मा.आयुक्त

संदर्भ :- १) मा.महापालिका आयुक्त यांचे जावक
क्र.प्रशा/१/कावि/१३८/२०१० दि.२७.१.२०१०
२) मा.विधी समितीकडील ठ.क्र.२६९ दि.१९.३.२०१०

१) श्री. दुगड उत्तमचंद गुलाबचंद (खुला) २) श्री. राउत शांताराम नामदेव (इमाव) ३) श्रीम. पार्टे कांचनमाला प्रकाश (खुला दि.१६/२/१०रोजी पात्र)या कार्यालय अधिक्षक (नायब तहसिलदार) पदावरील कर्मचा-यांना "प्रशासन अधिकारी या" पदावर र.रु. ९३०० - ३४८०० ग्रेड वेतन ५४०० या वेतनश्रेणीमध्ये पदोन्नतीने नियुक्ती देणेस मान्यता देणेत येत आहे.

मा.शंकर जगताप :- मा.महापौर साहेब, ठरावास अनुमोदन देतो.

यानंतर सदर ठराव मतास टाकणेत आला असता-

अनुकूल-६५ प्रतिकूल-०

अशी मते पडली व सदर ठराव सर्वानुमते मान्य झाल्याचे मा.महापौर यांनी प्रकट केले.

-----

मा.शंकर जगताप :- मा.महापौर साहेब, विषय क्रमांक ९ वर मी पुढीलप्रमाणे ठराव मांडतो.

विषय क्रमांक :- ९

दिनांक :-२१.४.२०१० विभाग :- मा.आयुक्त

संदर्भ :- १) मा.महापालिका आयुक्त यांचे जावक
क्र.नरवि/कावि/०५/४५/२०१० दि.५.२.२०१०
२) मा.विधी समितीकडील ठ.क्र.२७० दि.१९.३.२०१०

पुणे विभागातील पाच महानगरपालिका पुणे महानगरपालिका, पिंपरी चिंचवड महानगरपालिका,कोल्हापूर महानगरपालिका, सोलापूर महानगरपालिका, सांगली मिरज कूपवाड शहर महानगरपालिका व पिंपरी चिंचवड नवनगर विकास प्राधिकरण क्षेत्राच्या मंजुर विकास नियंत्रण नियमावलीमध्ये Special Regulation for the safety and security of building to counter man-made disaster बाबत विशेष नियमावलीचा समावेश करणेबाबत शासनाने महाराष्ट्र प्रादेशिक नियोजन व नगररचना अधिनियम,१९६६ चे कलम ३७(१) (ए ए) अन्वये एकत्रितपणे

प्रसिद्ध केलेल्या फेरबदल प्रस्तावावरील हरकती सुचना व मनपाचे अभिप्राय यावर विचार करुन अभिप्रायाप्रमाणे अहवाल पाठविणेस मान्यता देणेत येत आहे.

मा.राजू मिसाळ :- मा.महापौर साहेब, ठरावास अनुमोदन देतो.

मा.महापौर :-  विषय समजून सांगावा, माहिती द्यावी.

मा.अविनाश पाटिल (उपसंचालक नगररचना) :- मा.महापौर साहेब, शासनाने एक्सपर्ट कमिटि स्थापन केलेली होती  त्यांनी ज्या शिफारशी केलेल्या होत्या त्याच्या अनुषंगाने महाराष्ट्र शासनाने कलम ३७ प्रमाणे पब्लिश केलेले आहे त्याच्यावर जे सजेशन,ऑब्जेक्शन आलेले आहेत त्याच्यावर आपल्या महापालिकेचे म्हणणे सादर करण्याकरिता हा विषय आहे. वर्दळीच्या ठिकाणी अटॅक होण्याचा संभव आहे अशा बिल्डींग अॅडेन्टीफाय करणे, प्लॅनिंग अॅथोरेटीला नियम घालून दिलेले आहेत. कंपौड वॉलची उंची किती असावी,सिक्युरीटी गेट वेगळे असावे, अशा ब-याचशा कडक तरतूदी आहेत. काही घटना घडलीतर पटकन निघुन जाण्यासाठी वेगळे काहीतरी असावे. त्याच्यावर काही सुचना आलेल्या होत्या त्यावर आपण आपला अभिप्राय दिलेला आहे त्यात बिल्डींग सेक्यूरीटी अॅडव्हायजर कमिटिमध्ये कोण कोण असावे त्यामध्ये त्यांचा स्कोप काय असावा हे आहे.शासनाने कमिटी नेमण्यापेक्षा सर्व स्तरातील विकसक,वकील,इंजिनियर्स,आर्किटेक्ट,पोलिस आणि सिक्युरिटी एजन्सीज यांचेशी चर्चा करुन नियम बनवावेत व एक्सपर्ट असे सगळे लोक त्यामध्ये असावेत. फक्त त्यांनी डेप्युटी कमीशनर पोलीस असे ठेवलेले आहे. अशाप्रकारच्या ज्या बिल्डींग आहेत त्यांची यादी तयार करावी. हे आपल्याकडे आल्यानंतर एक महिन्याच्या आत सादर करावे असे आहे त्याप्रमाणे हे आपल्याकडे आलेले आहे.

मा.ज्ञानेश्वर भालेराव :- मा.महापौर साहेब, आता याचे माहितीपत्र दिलेले आहे ते अर्धवट आहे त्यामध्ये ताळमेळ नाही, घाणेरडया प्रती वाटलेल्या आहेत. एक महिन्याची मुदत देवून प्रती व्यवस्थीत प्रिन्ट काढून द्याव्यात. विषय क्रमांक ९ चा विचार पुढील सभेचे वेळी करणेत यावा अशी सूचना मी मांडतो.

मा.जगदीश शेट्टी  :- मा.महापौर साहेब, सूचनेस अनुमोदन देतो.

मा.महापौर :-  सर्वांना व्यवस्थीत प्रिन्ट काढून प्रती मिळाव्यात.

यानंतर सूचनेप्रमाणेचा ठराव मतास टाकणेत आला असता-

ठराव क्रमांक :- ८५५ विषय क्रमांक :- ९
दिनांक :-२१.४.२०१० विभाग :- मा.आयुक्त

संदर्भ :- १) मा.महापालिका आयुक्त यांचे जावक
क्र.नरवि/कावि/०५/४५/२०१० दि.५.२.२०१०
२) मा.विधी समितीकडील ठ.क्र.२७० दि.१९.३.२०१०

विषय क्रमांक ९चा विचार पुढील सभेचे वेळी करणेत यावा.

अनुकूल-६५ प्रतिकूल-०

अशी मते पडली व सदर ठराव सर्वानुमते मान्य झाल्याचे मा.महापौर यांनी प्रकट केले.

-----

मा.राजेश पिल्ले :- मा.महापौर साहेब, विषय क्रमांक १० वर मी पुढीलप्रमाणे ठराव मांडतो.

ठराव क्रमांक :- ८५६ विषय क्रमांक :- १०
दिनांक :-२१.४.२०१० विभाग :- मा.आयुक्त

संदर्भ :- १) मा.महापालिका आयुक्त यांचे जावक
क्र.प्रशा/१/कावि/२३८/१० दि.११.२.२०१०
२) मा.विधी समितीकडील ठ.क्र.२७४ दि.१९.३.२०१०

डॉ.श्रीम.पुनम अशोक भंगाळे यांनी महानगरपालिका सेवेमधील वैद्यकिय अधिकारी या पदाचा दिलेला राजीनामा मंजुर करुन त्यांनी महानगरपालिकेमध्ये तारण ठेवलेले र.रु.१०,०००/- चे राष्ट्रीय बचतपत्र जप्त करुन सदरची रक्कम महानगरपालिका कोषागारात जमा करण्यास मान्यता देणेत येत आहे.

मा.शांताराम भालेकर :- मा.महापौर साहेब, ठरावास अनुमोदन देतो.

यानंतर सदर ठराव मतास टाकणेत आला असता-

अनुकूल-६५ प्रतिकूल-०

अशी मते पडली व सदर ठराव सर्वानुमते मान्य झाल्याचे मा.महापौर यांनी प्रकट केले.

-----

मा.राजेंद्र साळूंके :- मा.महापौर साहेब, विषय क्रमांक ११ वर मी पुढीलप्रमाणे ठराव मांडतो.

विषय क्रमांक :- ११

दिनांक :-२१.४.२०१० विभाग :- मा.आयुक्त

संदर्भ- १) मा.महापालिका आयुक्त यांचे जावक क्र.अति/२/कावि/४१/२०१० दि.१०.०२.२०१०

२) मा.महापालिका सभा ठराव क्र.८३६ दि.२०/०३/२०१० अन्वये

विषय :- अनाधिकृत बांधकाम केलेल्या नगरसदस्यावर मुंबई प्रांतिक मनपा अधिनियम १९४९ चे कलम १२ अन्वये न्यायालयात संदर्भ करण्यासाठी परवानगी मिळणेबाबत-

श्री.संभाजी बारणे यांनी माहितीच्या अधिकारात करसंकलन विभागाकडून मिळविलेल्या माहितीप्रमाणे पिंपरी चिंचवड महापालिकेचे २५ नगरसदस्य/नगरसदस्या अनाधिकृत बांधकामाशी निगडीत असुन अशा नगरसदस्यावर कारवाई करण्यासाठीची विनंती महाराष्ट्र शासनाकडे करण्यात आली होती. शासनाने मनपा आयुक्ताकडे हे अर्ज चौकशीसाठी व पुढील कार्यवाहीसाठी पाठविले आहे.

या अर्जाच्या चौकशीकामी सर्व नगरसेवकांना कारणे दाखवा नोटीसा बजावून त्यांचा त्या संदर्भात खुलासा मागविणेत आला होता. त्यात काही नगरसदस्याचा खुलासा समाधान कारक असुन काही नगरसेवकांनी मात्र अनाधिकृत बांधकामे केलेली आहेत./ होती. असे प्रथम दर्शनी दिसुन येत आहे. अनाधिकृत बांधकामे गुंठेवारी कायद्यानुसार नियमानुकुल झालेली असली तरी त्यामुळे अशा नगरसेवकांवर अपात्रता सिध्द होते वा नाही ही बाब न्यायालयाकडे संदर्भ करुनच खात्री करणे शक्य आहे.

तसेच काही नगरसेवकांनी आपले खुलाशात सदरची मालमत्ता / बांधकामे आपले नसुन आपले वडिल / आई / इतर नातेवाईक यांचे आहेत असे आपल्या खुलाशात नमुद केलेले आहे व त्याप्रमाणे करसंकलन विभागाकडे दुरुस्त नोंदीचे कागदपत्र सादर केलेले आहेत. तथापि संबंधित नगरसेवकांनी निवडणूक नामनिर्देशन पत्र भरतेवेळी केलेले मालमत्ता विषयक प्रतिज्ञापत्र पाहता सदरची मालमत्ता त्यांनी त्यांचे नावे असल्याचे प्रतिज्ञापत्रात नमुद केलेले आहे. अशा प्रसंगी संबंधित नगरसेवक अपात्र होईल वा कसे याचा न्यायालयांनी निर्णय देणे योग्य राहील व त्यासाठी न्यायालयाकडे संदर्भ करणे गरजेचे आहे.

या पार्श्वभूमीवर उक्त अधिनियमाचे कलम १२ प्रमाणे नगरसदस्यांनी केलेल्या अनाधिकृत बांधकामाविषयी वाद उत्पन्न झाला असल्याने त्याविषयी न्यायाधिशांकडून निर्णय प्राप्त करुन घेणे आवश्यक झालेले आहे. तथापि कलम १२ तील तरतुदीप्रमाणे असा संदर्भ न्यायालयाकडे करण्यासाठी सभागृहाने आयुक्तांना निर्देश देणे/विनंती करणे आवश्यक आहे. यास्तव सदरील विषयपत्र दि.१७/०३/२००८ रोजी मा.महापालिका सभेपुढे ठेवणेत आले होते. तथापि महापालिका सभा ठराव क्रमांक

६५३ दि.०३/०६/२००९ अन्वये सदर विषयाबाबतचा विचार दि.१९/०६/२०१० चे सभेचेवेळी करणेत यावा असा निर्णय झाला.

मा.उपसचिव, नगरविकास विभाग महाराष्ट्र शासन यांचेकडील दि.२०/०१/२०१० चे पत्रामध्ये नमुद केलेप्रमाणे पिंपरी चिंचवड शहरातील अनाधिकृत बांधकामे असणाऱ्या नगरसेवकांचे पद रद्द करणेबाबत मुंबई प्रांतिक मनपा अधिनियम १९४९ चे कलम ४४८ चा विचार करता कलम ४४८ नुसार याप्रकरणी हे आदेश प्राप्त झालेपासुन ३० दिवसात सदरचा विषय महासभेपुढे ठेवून अधिनियमातील तरतुदीप्रमाणे निर्णय घेण्यात यावा असे निदेश दिलेले आहेत.

तरी सदरील शासनाकडील पत्राच्या अनुषंगाने सदरचा विषय मा.महापालिका सभेपुढे निर्णयार्थ ठेवणेत आला आहे. त्यास मान्यता देणेत येत आहे.

मा.राजेश पिल्ले :- मा.महापौर साहेब, ठरावास अनुमोदन देतो.

मा.जगदीश शेट्टी :- मा.महापौर साहेब, विषय क्रमांक ११ चा विचार पुढील सभेचे वेळी करणेत यावा अशी सूचना मी मांडतो.

मा.ज्ञानेश्वर भालेराव :- मा.महापौर साहेब, सूचनेस अनुमोदन देतो.

यानंतर सूचनेप्रमाणेचा ठराव मतास टाकणेत आला असता-

ठराव क्रमांक :- ८५७ विषय क्रमांक :- ११
दिनांक :-२१.४.२०१० विभाग :- मा.आयुक्त

संदर्भ- १) मा.महापालिका आयुक्त यांचे जावक क्र.अति/२/कावि/४१/२०१० दि.१०.०२.२०१०
२) मा.महापालिका सभा ठराव क्र.८३६ दि.२०/०३/२०१० अन्वये

विषय क्रमांक ११चा विचार पुढील सभेचे वेळी करणेत यावा.

अनुकूल-६५ प्रतिकूल-०

अशी मते पडली व सदर ठराव सर्वानुमते मान्य झाल्याचे मा.महापौर यांनी प्रकट केले.

-----

मा.शंकर जगताप :- मा.महापौर साहेब, विषय क्रमांक १२ वर मी पुढीलप्रमाणे ठराव मांडतो.

विषय क्रमांक :- १२

दिनांक :-२१.४.२०१० विभाग :- मा.आयुक्त

संदर्भ :- १) मा.महापालिका आयुक्त यांचे जावक
क्र.प्रशासन/६/कावि/१८८/२०१० दि. ३१.३.२०१०

विषयाचा आशय :- मुंबई प्रांतिक महानगरपालिका अधिनियम १९४९ चे कलम १३ नुसार श्री. उत्तम मुक्ताजी हिरवे-नगरसेवक यांचे पालिका सदस्यपद रद्द करुन त्यांच्याविरुध्द भा.द.वि.कलम ३५३ नुसार गुन्हा दाखल करण्यासाठी ३/४ पालिका सदस्यांची शिफारस शासनाकडे पाठविण्याबाबत.

वरील विषयाच्या आशयाचे दिनांक १९/०१/२०१० विषयपत्र प्रशासनाने मा.महापालिका सभेपुढे सादर केले होते. त्यानुषंगाने मा.महापालिका सभेने ठराव क्रमांक ८१९,दिनांक २०/०२/२०१० अन्वये " अधिनियमातील तरतुदीनुसार श्री. उत्तम मुक्ताजी हिरवे यांना कारणे दाखवा नोटीस देऊन त्यांचा खुलासा घ्यावा व खुलाशावरील अभिप्रायासह आयुक्तांनी फेरसादर करावे " असे आदेश दिले आहेत.

मा.महापालिका सभेच्या उक्त आदेशानुसार श्री.हिरवे-नगरसेवक यांचा खुलासा घेण्यासाठी दिनांक ०२/०३/२०१० ची नोटीस श्री.हिरवे यांच्यावर बजाविण्यात आली होती. या नोटीसीचा खुलासा श्री.हिरवे यांनी दिनांक १५/०३/२०१० चे पत्राने त्यांचे वकिलांमार्फत सादर केलेला आहे. नोटीसीचे खुलाशात श्री.हिरवे यांनी घटना घडल्याचे नाकारले आहे. कोणत्याही महापालिका कर्मचा-यांस मारहाण केली नाही. साफसफाईचे काम शांततेने करुन घेण्याचा प्रयत्न केलेला आहे. श्री. काळे मुकादम यांनी राजकीय हेतुने पोलीस चौकीमध्ये तक्रार दाखल केलेली आहे. त्यामुळे सदर तक्रारीचा गुणवत्तेनुसार निर्णय होईपर्यंत पालिका सदस्यत्व रद्द करण्याचा अधिकार महापालिका सभेस नाहीत ते बेकायदेशिर आहे. असा खुलासा श्री.हिरवे यांनी वकिलामार्फत सादर केलेला आहे.

श्री.हिरवे-नगरसेवक यांचा उक्त खुलासा स्वीकारणे योग्य नाही. त्यांनी पालिकेच्या अपंग कर्मचा-यांस मारहाण केलेली आहे. सदर कर्मचा-यांस वाय.सी.एम.रुग्णालयात उपचार घेणे भाग पडले आहे. श्री.हिरवे यांनी ते निर्दोष असल्याबाबत कोणतेही संयुक्तीक कारण दिलेले नाही. घटना घडलेली असतांना वर्तमानपत्रातुनही घटनेस प्रसिध्दी मिळालेली असतांना व वस्तुस्थितीनुसार तसे स्पष्ट दिसून येत असतांना केवळ घटना घडली नाही असे अभिवेदन देऊन श्री.हिरवे हे महापालिका सभेची दिशाभुल करीत आहेत. पोलीस चौकीत दाखल झालेली तक्रार व महापालिका सभेपुढे निर्णयार्थ दाखल असलेले विषयपत्र या दोन्ही भिन्न बाबी आहेत. मुंबई प्रांतिक महापालिका अधिनियमातील कलम १३ नुसार श्री.हिरवे यांचे

पालिका सदस्यपद रद्द करण्याबाबत शासनाकडे शिफारस करण्याचा यथोचित निर्णय घेणे कायदेशिर बाब आहे.

सबब श्री.हिरवे-नगरसेवक यांचेवर बजाविलेल्या नोटीसीची प्रत व त्यांनी वकिलामार्फत सादर केलेल्या खुलाशाची प्रत मा.महापालिका सभेच्या अवलोकनार्थ (सोबत जोडलेली आहे) सादर करुन श्री.हिरवे यांचे पालिका सदस्यपद रद्द करण्याबाबत शासनाकडे शिफारस करण्याचा यथोचित निर्णय घेण्यासाठी प्रस्तुत विषय मा.महापालिका सभेपुढे सादर करणेत आला आहे. त्यास मान्यता देणेत येत आहे.

मा.प्रशांत शितोळे :- मा.महापौर साहेब, ठरावास अनुमोदन देतो.

मा.ज्ञानेश्वर भालेराव :- मा.महापौर साहेब, विषय क्रमांक १२ चा विचार पुढील सभेचेवेळी करणेत यावा अशी सूचना मी मांडतो.

मा.जगदीश शेट्टी :- मा.महापौर साहेब, सूचनेस अनुमोदन देतो.

यानंतर सुचनेप्रमाणेचा ठराव मतास टाकणेत आला असता-

ठराव क्रमांक :- ८५८ विषय क्रमांक :- १२

दिनांक :-२१.४.२०१० विभाग :- मा.आयुक्त

संदर्भ :- १) मा.महापालिका आयुक्त यांचे जावक क्र.प्रशासन/६/कावि/१८८/२०१० दि. ३१.३.२०१०

विषय क्रमांक १२चा विचार पुढील सभेचे वेळी करणेत यावा.

अनुकूल-६५ प्रतिकूल-०

अशी मते पडली व सदर ठराव सर्वानुमते मान्य झाल्याचे मा.महापौर यांनी प्रकट केले.

-----

मा.तानाजी खाडे :- मा.महापौर साहेब, विषय क्रमांक १३ वर मी पुढीलप्रमाणे ठराव मांडतो.

ठराव क्रमांक :- ८५९ विषय क्रमांक :- १३

दिनांक :-२१.४.२०१० विभाग :- मा.नगरसचिव

मा. विधी समिती

अ) दि.१५/१/२०१० व ५/२/२०१० चे सभेचा सभावृत्तांत कायम करणेत येत आहे.

ब) दि.५/२/२०१० चे सभेचा सभावृत्तांत कायम करणेत येत आहे.

मा.रामअधार धारिया :- मा.महापौर साहेब, ठरावास अनुमोदन देतो.

यानंतर सदर ठराव मतास टाकणेत आला असता-

अनुकूल-६५ प्रतिकूल-०

अशी मते पडली व सदर ठराव सर्वानुमते मान्य झाल्याचे मा.महापौर यांनी प्रकट केले.

-----

मा.तानाजी खाडे :- मा.महापौर साहेब, विषय क्रमांक १४ वर मी पुढीलप्रमाणे ठराव मांडतो.

ठराव क्रमांक :- ८६० विषय क्रमांक :- १४

दिनांक :-२१.४.२०१० विभाग :- मा.नगरसचिव

मा. महिला व बालकल्याण समिती

दि.१०/२/२०१० चे सभेचा सभावृत्तांत कायम करणेत येत आहे.

मा.रामअधार धारिया :- मा.महापौर साहेब, ठरावास अनुमोदन देतो.

यानंतर सदर ठराव मतास टाकणेत आला असता-

अनुकूल-६५ प्रतिकूल-०

अशी मते पडली व सदर ठराव सर्वानुमते मान्य झाल्याचे मा.महापौर यांनी प्रकट केले.

-----

मा.तानाजी खाडे :- मा.महापौर साहेब, विषय क्रमांक १५ वर मी पुढीलप्रमाणे ठराव मांडतो.

ठराव क्रमांक :- ८६१ विषय क्रमांक :- १५

दिनांक :-२१.४.२०१० विभाग :- मा.नगरसचिव

मा. झोपडपट्टी सुधार, गृहनिर्माण आणि समाज कल्याण समिती

दि.१७/२/२०१० व ३/३/२०१० चे सभेचा सभावृत्तांत कायम करणेत येत आहे.

मा.रामअधार धारिया :- मा.महापौर साहेब, ठरावास अनुमोदन देतो.

यानंतर सदर ठराव मतास टाकणेत आला असता-

अनुकूल-६५ प्रतिकूल-०

अशी मते पडली व सदर ठराव सर्वानुमते मान्य झाल्याचे मा.महापौर यांनी प्रकट केले.

-----

मा.तानाजी खाडे :- मा.महापौर साहेब, विषय क्रमांक १६ वर मी पुढीलप्रमाणे ठराव मांडतो.

ठराव क्रमांक :- ८६२ विषय क्रमांक :- १६
दिनांक :-२१.४.२०१० विभाग :- मा.नगरसचिव

मा. क्रिडा समिती

अ) दि.३/२/२०१० व ५.२.२०१० चे सभेचा सभावृत्तांत कायम करणेत येत आहे.
ब) दि.१७/२/२०१०,३/३/२०१० व १७/३/२०१० चे सभेचा सभावृत्तांत कायम करणेत येत आहे.
क) दि.१७/३/२०१० चे सभेचा सभावृत्तांत कायम करणेत येत आहे.

मा.रामअधार धारिया :- मा.महापौर साहेब, ठरावास अनुमोदन देतो.

यानंतर सदर ठराव मतास टाकणेत आला असता-

अनुकूल-६५ प्रतिकूल-०

अशी मते पडली व सदर ठराव सर्वानुमते मान्य झाल्याचे मा.महापौर यांनी प्रकट केले.

-----

मा.सतीष दरेकर :- मा.महापौर साहेब, विषय क्रमांक १७ वर मी पुढीलप्रमाणे ठराव मांडतो.

ठराव क्रमांक :- ८६३ विषय क्रमांक :- १७
दिनांक :-२१.४.२०१० विभाग :- मा.आयुक्त

संदर्भ- १) क्र.नरवि/कावि/रहाटणी/८९/२०१० दि.११/२/२०१० रोजीचा मा.आयुक्त साो. यांचा प्रस्ताव.
२) मा.ड प्रभाग समितीकडील ठ.क्र.१४१ दि. ३.४.२०१०

मौजे-रहाटणी (काळेवाडी) येथील स.नं.८३/१ मधील २.५ एकर म्हणजेच १०० आर.पड जमीन पिंपरी चिंचवड महानगरपालिकेच्या सुधारित मंजूर विकास योजनेनुसार हरित विभागात समाविष्ट आहे. प्रस्तुतची जमिन गोविंद गेणू नखाते,

निवृत्ती व राजाराम अण्णा नखाते यांचे मालकीची आहे. सदरची जमिन खाजगी वाटाघाटीने मुस्लिम व खिश्चन समाजाची दफनभूमीसाठी आरक्षित करुन ताब्यात घेणेस मा.महापालिका सभेने ठराव क्र. ५३०९, दि. २४/८/२००५ अन्वये मान्यता दिलेली आहे.

प्रस्तुतची मिळकत नदीपात्रालगत असून,त्यापैकी ३० आर. जमिन सन २००३ मध्ये लहान मुलांचे दफनभूमिसाठी, संडास ब्लॉक विस्ताराकरीता,स्मशानभूमि बैठकशेड इत्यादी प्रयोजनासाठी महानगरपालिकेने खाजगी वाटाघाटीने ताब्यात घेतलेली आहे. तसेच सदर मिळकतीमधून ४५.०० मी.रुंद रस्ता प्रस्तावित असून, सदर रस्त्याने १७ आर क्षेत्र बाधित होत आहे. सदर ४५.०० मी. रस्त्याचे भूसंपादन अंतिम निवाडा जाहिर करणेवर आहे.

विषयांकित जमिनीमध्ये आता कमीत कमी ८५ आर क्षेत्र शिल्लक असल्याचे आढळून येते. परंतु सदरची मिळकत पवना नदीलगत असून, उच्च पुर पातळीमध्ये येत आहे.

संदर्भ क्र. १ चे मा.महापालिका सभेचे मान्य ठरावानुसार व संदर्भ क्र. २ व ३ चे जमिन मालकांचे विनंती अर्जानुसार विषयांकित जमिन खाजगी वाटाघाटीने मनपाच्या ताब्यात घेणेबाबत इकडील विभागाने सदर जमिनीचे मुल्यांकन यापुर्वीच म्हणजेच सन २००६ मध्ये केलेले असून, सदर मुल्यांकनानुसार ३८६/- प्रति चौ.मी. इतका दर निश्चित केलेला होता. त्यानुसार अर्जदार श्री.नखाते यांना सदरचा दर मान्य असलेस तसे इकडील विभागास कळविणेबाबत संदर्भ क्र.४ अन्वये कळविलेले होते.

परंतु सदर पत्रास जमिन मालकांनी अदयाप मान्यता दिलेली नाही. त्यामुळे सदर प्रस्तावावर इकडील विभागामार्फत पुढील कार्यवाही करणेत आलेली नाही.

आता संदर्भ क्र. ५ अन्वये श्री.अकिलभाई मुजावर अध्यक्ष,पिं.चिं.शहर जिल्हा कॉ.आय.यांनी निवेदन दिले असून, सदर निवेदनामधील मुद्या क्र. २ नुसार काळेवाडी,थेरगांव,वाकड येथील मुस्लिम समाजाकरीता दफनभूमीची व्यवस्था करणेबाबत मागणी केलेली आहे.

सदर मागणीनुसार व अर्जदार व इतर यांचेबरोबर दि. ८/१/२०१० रोजी झालेल्या चर्चेमध्ये ठरलेनुसार (संदर्भ क्र. ६ चे सभावृत्तांतानुसार) विषयांकित मौजे-रहाटणी येथील स.नं.८३/१ पैकी या जागेमध्ये प्रस्तावित ४५.०० मी.रस्ता सोडून उर्वरित जागेमध्ये मुस्लिम समाजाच्या दफनभूमीसाठी विकास योजनेमध्ये “दफनभूमिसाठी” या प्रयोजनाचे आरक्षण प्रस्तावित करणेकामी महाराष्ट्र प्रादेशिक अधिनियम, १९६६ चे कलम ३७ अन्वये विहीत कार्यवाही करणेकामी विषय मान्यतेकामी “ड” प्रभाग समितीपुढे आला असता, मा.विजया सुतार यांनी पुढीलप्रमाणे उपसूचना मांडली.

मौजे-रहाटणी (काळेवाडी) येथील स.नं. ८३/१ पै.जमिन मुस्लिम दफनभूमीकरता ताब्यात न घेता मुस्लिम दफनभूमीकरीता थेरगांव येथील प्राधिकरण क्षेत्रातील एम.एम.शाळेमागील सेक्टर क्र. ३४ मधील जागा प्राधिकरणाकडून ताब्यात घेण्यात येऊन विकसित करण्याकामीच्या प्रस्तावास मान्यता देणेत येत आहे.

सदर ठराव कायम होणेची वाट न पहाता मान्यता मिळणेकामी शिफारस करणेत आली आहे त्यास मान्यता देणेत येत आहे.

मा.राजेश पिल्ले :- मा.महापौर साहेब, ठरावास अनुमोदन देतो.

मा.श्रीरंग बारणे :- मा.महापौर साहेब, आयुक्तांचा मुळ प्रस्ताव मंजुर करणेत यावा.

मा.ज्ञानेश्वर भालेराव :- मा.महापौर साहेब, आयुक्तांनी खुलासा करावा.

मा.महापौर :- प्रशासनाने खुलासा करावा.

मा.अविनाश पाटिल (उपसंचालक नगररचना) :- मा.महापौर साहेब,दफनभूमीची निकड असल्यामुळे या क्षेत्रामध्ये पुर्वी खाजगी वाटाघाटीने जागा ताब्यात घेण्यासाठी प्रयत्न केलेला होता तो सफल झालेला नाही. कलम ३७ प्रमाणे प्रभागाकडे तसा प्रस्ताव ठेवलेला होता. त्यांच्याकडून विषय आलेला आहे. ही संघटना मा.आयुक्तांकडे आलेली होती . दोघांसाठी आपण प्रयत्न करु असे ठरले. प्राधिकरणाकडे सुध्दा कलम ३७ अन्वये मागणी केलेली आहे.

मा.विजया सुतार :- मा.महापौर साहेब, हा विषय मंजूर करणेत यावा. प्रभागात दुरुस्ती केलेली आहे त्याप्रमाणे करावा.

मा.अविनाश पाटिल (उपसंचालक नगररचना) :- मा.महापौर साहेब,आपण दोन्ही प्रयत्न करत आहोत, दफनभूमीची त्या क्षेत्रामध्ये निकड आहे. ३७ मान्य केले नाहीतर प्राधिकरणावर अवलंबून रहावे लागेल.

मा.महापौर :- सुतारताईनी सूचना केल्याप्रमाणे अडचण येणार का.

मा.अविनाश पाटिल (उपसंचालक नगररचना) :- मा.महापौर साहेब, प्राधिकरणाचे घ्यावे लागेल, त्यांनी नाही म्हणलेतर आपल्याला सुविधा देता येत नाहीत.

मा.शंकर जगताप :- मा.महापौर साहेब, या विषयाबद्यल आपण कलम ३७ प्रमाणे कार्यवाही करतो तो शेतकरी सुध्दा वाटाघाटीला तयार होत नाही. सूतारताईनी जी सूचना केली आहे ती ड-प्रभागात मान्य झालेली आहे. आयुक्तांचा जो प्रस्ताव आहे तो न मानता आपण प्राधिकरणाकडून जागा घेवून त्याठिकाणी दफनभूमी करावी.

मा.महापौर :- प्रभागाने विषय मंजूर केला आहे तसा विषय मंजूर करणेत यावा.

यानंतर सदर ठराव मतास टाकणेत आला असता-

अनुकूल -६५ प्रतिकूल-०

अशी मते पडली व सदर ठराव सर्वानुमते मान्य झाल्याचे मा.महापौर यांनी प्रकट केले.

------

मा.शंकर जगताप :- मा.महापौर साहेब, विषय क्रमांक १८ वर मी पुढीलप्रमाणे ठराव मांडतो.

ठराव क्रमांक :- ८६४ विषय क्रमांक :- १८
दिनांक :-२१.४.२०१० विभाग :- मा.आयुक्त

संदर्भ- १) मा.आयुक्त यांचेकडील जा.क्र.स्था/ड मु/६८/२०१०
दि.१६.०४.२०१०

पिंपरी चिंचवड मनपा हद्दी बाहेरील वाकड येथील कासारसाई जकात नाक्यापासुन आय.टी.पार्क हिंजवडीकडे जाणा-या पर्यायी रस्त्याचे मजबुतीकरण करणे [हद्यीबाहेरचे काम] कामी येणारे र.रु. ४४,०६,०००/- चे खर्चास प्रशासकीय मान्यता देणेत येत आहे.

मा.शांताराम भालेकर :- मा.महापौर साहेब, ठरावास अनुमोदन देतो.

यानंतर सदर ठराव मतास टाकणेत आला असता-

अनुकूल -६५ प्रतिकूल-०

अशी मते पडली व सदर ठराव सर्वानुमते मान्य झाल्याचे मा.महापौर यांनी प्रकट केले.

------

मा.महापौर :-  महाराष्ट्र राज्याला ५० वर्षे पुर्ण होत असल्याने सुवर्णमहोत्सव साजरा करणार आहोत त्याच्या नियोजनासाठी व या शहरात सांस्कृतीक कार्यक्रम घेवून हा महोत्सव उत्साहाने साजरा करायचा आहे  त्यासाठी आपल्या सुचना असतीलतर त्या करिता उदया दि.२२.४.२०१० रोजी सकाळी ११.०० वाजता स्थायी समिती सभागृहात बैठक आयोजीत केलेली आहे. तरी सर्व पक्षाच्या नेत्यांना,गटनेत्यांना विनंती करणेत येते की हा सुवर्ण महोत्सव तीन दिवस साजरा करायचा आहे व तो जोराने,जोमाने करायचा आहे त्यामुळे आपण सर्वानी बैठकीस हजर रहावे. सर्वाचे आभार मानून सभा संपल्याचे जाहीर करणेत येत आहे.

(योगेश मंगलसेन बहल )
महापौर
पिंपरी चिंचवड महानगरपालिका
पिंपरी - ४११ ०१८

पिंपरी चिंचवड महानगरपालिका
नगरसचिव कार्यालय
क्रमांक - नस/९/कावि/ ५८२ /१०
दिनांक :-   ४ / ५ /२०१०

सही/-
नगरसचिव
पिंपरी चिंचवड महानगरपालिका
पिंपरी - १८

प्रत :  सर्व संबंधित शाखाप्रमुख व शाखाधिकारी यांजकडे पुढील योग्य त्या कार्यवाहीसाठी रवाना.